
## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी निधीला मान्यता



**मुंबई :** अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा व मदत देण्यासाठी शासन संवेदनशील असून जून ते ऑगस्ट या कालावधीत नांदेड, परभणी, सातारा आणि सांगली जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे बाधित शेतकऱ्यांना नुकसानीपोटी मदत देण्यासाठी ६८९ कोटी ५२ लाख ६१ हजार रुपयांच्या निधीस शासनाने मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असल्याचे मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले. नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना मदत करण्यात शासन संवेदनशील असून नैसर्गिक आपत्तीमध्ये दिलेल्या मदतीचा निधी शेतकऱ्यांच्या कर्ज अथवा अन्य वसुलीत वळती करू नये. यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या स्तरावरून बँकांना निर्देश द्यावेत, अशा स्पष्ट सूचनाही मदत व पुनर्वसनमंत्री जाधव-पाटील यांनी दिल्या आहेत.


रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १८ ◆ अंक ६४

www.ramprahar.com

# राम प्रहर

रविवार, २१ सप्टेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


### अंतरंग


संमतीशिवाय गर्भपात; तरुणावर गुन्हा दाखल/२

रविवारनिमित्त विविध विषयांवरील लेख/४, ६

ध्रुवी अन् अर्णव खाडेचा जलतरणात डंका/८


# युवाशक्तीच्या जोरावर भारत २०४७ साली विकसित देश होणार

## मंत्री ॲड. आशिष शेलार यांचा विश्वास



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तरुणांची सर्वात जास्त संख्या असलेला जगातील सर्वात मोठा आपला भारत देश आहे. त्या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युवाशक्तीवर लक्ष केंद्रित केले असून या युवाशक्तीच्या जोरावर आपला देश २०४७ साली विकसित होणार आहे. त्यास अनुसरून देशातील युवक-युवतींनी देशाच्या विकासात आपले योगदान द्यावे, असे आवाहन राज्याचे माहिती व तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी युवकांशी संवाद साधताना केले.

ना. आशिष शेलार यांनी युवकांशी सहज, सरळ आणि सोप्या शैलीत संवाद साधला. युवाशक्ती काय करू शकते याची उदाहरणे देत त्यांनी युवाशक्तीचे महत्त्व अधोरेखित केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान आणि लोकशाही जगातीत सर्वोत्कृष्ट असल्याचे त्यांनी नमूद करतानाच ती देशाची ताकद असल्याचेही सांगितले.



देशाचे कणखर नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरपर्यंत सेवा पंधरवडा आयोजित करण्यात आला असून या माध्यमातून विविध समाजोपयोगी उपक्रमांचे मोठ्या प्रमाणात आयोजन करण्यात आले आहे. त्या अंतर्गत युवकांच्या पुढील वाटचालीकरिता 'विकसित भारत विकसित महाराष्ट्र' या शिर्षकाखाली पनवेल शहरातील विरूपाक्ष मंगल कार्यालयात उत्तर रायगड जिल्हा भारतीय जनता पक्षाच्या वतीने युवा संवाद मेळावा शुक्रवारी (दि. १९) हजारो युवकांच्या उपस्थितीत आणि मोठ्या उत्साहात झाला. या मेळाव्याचे प्रमुख पाहुणे म्हणून मंत्री ॲड. शेलार यांनी युवकांशी थेट संवाद साधला.

व्यासपीठावर प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, पनवेल मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, उरण मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे आदी उपस्थित होते. या मेळाव्याला स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, मंडळ अध्यक्ष आणि पदाधिकारी हजर होते.

मंत्री आशिष शेलार यांनी युवकांशी संवाद साधताना म्हटले की, आपला देश विविध भाषा, संस्कृती, निसर्ग आणि विविध परंपरेने नटलेला एकसंघ देश आहे. आपल्या देशाशेजारील देशांची काय बिकट परिस्थिती झाली आहे हे आपण सर्वजण जाणताच आहात. श्रीलंकेची लोकशाही गेली. पाकिस्तान, बांगलादेश आणि आता नेपाळची परिस्थिती कशी वाईट झाली हे सर्वांनी बघितले आहे, पण आपल्या देशात घरातूनच संस्कार मिळत आहेत. त्यामुळे आपला भारत जगातील सर्वात समृद्ध लोकशाही असलेला देश आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपला देश शंभर वर्षांचा होईल तेव्हा म्हणजेच सन २०४७ला आपला देश विकसित देश म्हणून गणला जाणार आहे. जागतिक दर्जाचे विविध प्रकल्प या परिसरात येत असल्याने देशाच्या विकासाचे केंद्र पनवेल, रायगड होणार आहे. त्यामुळे येथील तरुणांना शिक्षण, रोजगार, व्यवसाय आणि करिअरच्या विविध क्षेत्रातील संधी मिळणार आहेत. **(पान २ वर..)**



**डोंबिवली :** भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांना वाढदिवसानिमित्त पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर आणि उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप नेते तथा रायगड जि.प.चे माजी अध्यक्ष ॲड.आस्वाद पाटील, महिला मोर्चा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष चित्रा पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. (अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

## 'इतर देशांवरील अवलंबित्व आपला सर्वात मोठा शत्रू'

**भावनगर : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी (दि. २०) गुजरातमधील भावनगर येथे आयोजित एका रोड शोमध्ये सहभागी झाले होते. या वेळी त्यांनी ३४,२०० कोटी रुपयांच्या विकासकामांचे उद्घाटन आणि भूमिपूजन केले.

यानंतर जाहीर सभेला संबोधित करताना पंतप्रधान मोदींनी, या जगात आपला कोणीही शत्रू नाही. भारताचा कोणी शत्रू असेल, तर तो म्हणजे इतर देशांवरील आपले अवलंबित्व. आपण आत्मनिर्भर (स्वावलंबी) झालो, तर या शत्रूवर आपण सहज मात करू शकतो, असे प्रतिपादन केले.

## एसटी महामंडळात मेगा भरती

### १७ हजारांपेक्षा जास्त पदे भरणार

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ लवकरच १७ हजारांपेक्षा पेक्षा जास्त चालक आणि सहाय्यक पदांसाठी कंत्राटी पद्धतीने भरती प्रक्रिया राबवणार आहे. या भरतीमुळे राज्यात रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होणार आहेत. येत्या २ ऑक्टोबरपासून ई-निविदा प्रक्रियेला सुरुवात होईल.

या भरती अंतर्गत एकूण १७ हजार ४५० पदे भरली जाणार असून चालक व सहाय्यक उमेदवाराला दरमहा ३० हजार पगार देण्यात येणार आहे. शिवाय, उमेदवारांना एसटीकडून प्रशिक्षणदेखील दिले जाणार आहे. महत्त्वाचे म्हणजे निवड झालेल्या



उमेदवारांसोबत तीन वर्षांसाठी करार केला जाईल. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ३००व्या संचालक मंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

या भरतीचा मुख्य उद्देश एसटी महामंडळाच्या सेवेला अधिक बळकट करणे आणि प्रवाशांना उत्तम सुविधा पुरवणे आहे. मेगा भरतीमुळे राज्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत सुधारणा होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आहे.

## निवडक

### रेल्वे प्रवाशांसाठी खुशखबर! 'रेल नीर'च्या दरात कपात

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने जीएसटी दरांमध्ये मोठी कपात केल्यानंतर त्याचा फायदा थेट ग्राहकांपर्यंत पोहचवण्यासाठी अनेक कंपन्यांनी आपल्या उत्पादनांच्या किमती कमी केल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर आता रेल्वे मंत्रालयाने 'रेल नीर' या ब्रँडच्या पाण्याच्या बाटल्यांच्या दरात कपात केली आहे. या निर्णयानुसार यापूर्वी १५ रुपयांना मिळणारी एक लिटर पाण्याची बाटली आता १४ रुपयांना, तर अर्धा लिटर पाण्याची बाटली दहा रुपयांऐवजी नऊ रुपयांना मिळेल.

### अभिनेते मोहनलाल यांना दादासाहेब फाळके पुरस्कार

**नवी दिल्ली :** मल्याळम चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेते मोहनलाल यांना प्रतिष्ठेचा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने शनिवारी (दि. २०) याबाबतची घोषणा केली. २०२३साठी दिला जाणार दादासाहेब फाळके पुरस्कार २३ सप्टेंबर रोजी शानदार सोहळ्यात प्रदान केला जाणार आहे.

## पनवेलमध्ये आज नमो युवा रन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्ह्याच्या वतीने रविवारी (दि. २१) सकाळी ६ वाजता पनवेलमधील वडाळे तलाव येथे नमो युवा रनचे आयोजन करण्यात आले आहे.

'स्वस्थ आणि नशामुक्त भारताच्या निर्मितीसाठी' या शीर्षकाखाली होणाऱ्या या रनचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी आमदार सुरेश लाड यांच्या हस्ते होणार आहे.

या वेळी माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, चारुशीला घरत यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, पनवेल दक्षिण मंडळ अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल पश्चिम मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ, उरण शहर अध्यक्ष प्रसाद भोईर, उरण ग्रामीण अध्यक्ष धनेश गावंड, खालापूर पश्चिम अध्यक्ष प्रवीण मोरे, खालापूर पूर्व अध्यक्ष सनी यादव, कर्जत शहर अध्यक्ष राजेश लाड, कर्जत ग्रामीण अध्यक्ष दिनेश रसाळ, नेरळ मंडळ अध्यक्ष नरेश मसणे आदी उपस्थित राहणार आहेत.

## आरोग्याविषयी नागरिकांमध्ये जागृती -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या नेतृत्वाखालील महायुतीच्या सरकारमुळे संपूर्ण महाराष्ट्रात आरोग्याविषयी जागृती निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी नेरे येथे आरोग्य शिबिरावेळी केले.

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान सेवा पंधरवडा आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत रायगड जिल्हा परिषद आरोग्य विभाग आणि राज्य शासनाच्या वतीने नेरे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मोफत आरोग्य शिबिर शनिवारी (दि. २०) आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते आणि आमदार विक्रांत पाटील यांच्या उपस्थितीत झाले. त्या





### नेरे येथील शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद

वेळी ते बोलत होते.

दरम्यान, या शिबिराला आमदार सुनील राणे, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी भेट देऊन पाहणी केली.

या शिबिरात रक्तदाब, मधुमेह, नेत्र, दंतरोग तपासणी, स्तन आणि गर्भाशय मुख कर्करोग तपासणी, गरोदर महिलांसाठी प्रसूतीपूर्व तपासणी, लसीकरण सेवा, रक्त आणि हिमोग्लोबिन तपासणी, क्ष-किरण तपासणी आणि तज्ज्ञांचा सल्ला व मार्गदर्शन देण्यात आले. या शिबिराला नागरिकांनाच उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, माजी जि.प. सदस्य राजेंद्र पाटील, अमित जाधव, माजी पं.स. सदस्य राज पाटील, भाजप पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, नेरे विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, रोशन पाटील, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, शांताराम चौधरी, राजा भालेकर, गटविकास अधिकारी समीर वाठारकर, सुनील पाटील, प्रकाश घाडगे, रोशन पाटील, महेश पाटील, राज पाटील, प्रवीण म्हात्रे, यतिन पाटील, माजी सरपंच वासुदेव गवते, श्याम भालेकर, **(पान २ वर..)**

## नारळाच्या शहाळ्यापासून देवीचे मुखवटे

### उरण नागावमधील पाच दशकांची परंपरा; भाविकांकडून मागणी

**उरण : वार्ताहर**

येत्या सोमवार (दि. २२)पासून नवरात्रोत्सवाला सुरुवात होत असून यानिमित्ताने सार्वजनिक तसेच घरगुती स्वरूपात घटस्थापना होईल. यासाठी उरणजवळील नागाव येथील गजाजन विठ्ठल नाईक यांच्याकडे मागील पाच दशकांपासून नारळाच्या शहाळ्यांनी देवीचे मुखवटे बनविण्याची परंपरा आहे.

नवरात्रोत्सवाच्या दहा दिवस अगोदर हे मुखवटे तयार करण्यास सुरुवात केली जाते. बाजारात मिळणाऱ्या देवीच्या मुखवट्यापेक्षा घरगुती पूजेसाठी नारळाच्या शहाळ्याच्या मुखवट्याची मागणी भाविकांकडून करण्यात येत आहे. त्यासाठी उरणमध्ये दरवर्षी अशा प्रकारचे मुखवटे बनविण्यात येतात. या मुखवट्यांना रायगड जिल्ह्यातील उरण, फुंडे, नवीन शेवा, डोंगरीसह पनवेल, नवी मुंबई, ठाणे, अलिबाग, पेण तालुक्यातील भाविकांकडून मागणी आहे.



उरणच्या नागावमध्ये दोन ठिकाणी ही कला परंपरेने जपली जात आहे. यामध्ये ८३ वर्षीय गजानन नाईक हे गेल्या ४० वर्षांपासून देवीची सेवा म्हणून नारळाच्या शहाळ्यापासून मुखवटे तयार करीत आहेत. त्यांना चित्रकलेची आवड होती. त्यामुळे मित्रांनी त्यांच्याकडून असे मुखवटे तयार करून घेण्यास सुरुवात केली. अशा प्रकारच्या मागणीनंतर त्यातूनच ही परंपरा सुरू झाल्याचे ते आवर्जून सांगतात. हे मुखवटे तयार करण्यासाठी नवरात्रोत्सवाच्या दहा दिवस अगोदरपासून तयारी करावी लागते. पूर्वी ते ५० ते ६० मुखवटे बनवित असत, परंतु कोरोनानंतर हे काम कमी केले. सध्या दरवर्षी किमान २५ ते ३० मुखवटे ते याही वयात कलेचे एक साधक म्हणून करीत आहेत. शहाळ्याबरोबरच धातूच्या मुखवट्यांना रंगविण्याचे काम ते करतात. यासाठीचे कोणत्याही प्रकारचे दर ठरविण्यात आलेले नसून देवीचे भक्त कलेची जाण ठेवून जो मोबदला देतील तो ते घेतात हे विशेष. त्यांची ही परंपरा पुढे नेण्याचे काम या कलेचा छंद असलेला नातू हर्षवर्धन पवार करीत आहे.

बाजारात तयार मुखवटे विक्रीसाठी आलेले आहेत, मात्र तरीही काही भाविक परंपरेने नारळाच्या शहाळ्यापासून तयार केलेल्या मुखवट्यांना पसंती देत आहेत.

## आशिया कपमध्ये आज पुन्हा भारत वि. पाक लढत

**दुबई : वृत्तसंस्था**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत रविवारी (दि. २१) कट्टर पारंपरिक प्रतिस्पर्धी भारत आणि पाकिस्तानचे संघ पुन्हा एकदा आमने-सामने येणार आहेत. त्यामुळे या लढतीकडे क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे.



स्पर्धेतील सुपर ४ फेरीचा उभय संघांतील हा सामना दुबई इंटरनॅशल स्टेडियममध्ये रात्री ८ वाजल्यापासून खेळवण्यात येणार आहे.

स्पर्धेच्या साखळी फेरीत गेल्या रविवारी भारत आणि पाकिस्तानचे संघ भिडले होते. त्या वेळी प्रचंड दबावाचा सामना करत भारतीय संघाने पाकिस्तानवर सहजपणे विजय मिळवला होता. आता पुन्हा एकदा दोन्ही संघांमध्ये थरार पहायला मिळणार आहे.

## सर्वात मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचे गुरुवारी पनवेलमध्ये पारितोषिक वितरण

**मुंबई : प्रतिनिधी**

विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी बजावणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २४व्या राज्यस्तरीय व रायगड जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा गुरुवारी (दि. २५) दुपारी ३ वाजता पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे.

या वेळी राज्याचे सांस्कृतिकमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते विजेत्या दिवाळी अंकांना पारिताषिके देण्यात येतील. सोहळ्याला महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष सदानंद मोरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत, तर माजी खासदार लोकनेते खासदार रामशेठ ठाकूर अध्यक्षस्थान भूषवणार आहेत.

दिवाळी अंकांच्या परंपरेला प्रोत्साहित करणाऱ्या या स्पर्धेतील विजेत्यांना लाखो रुपयांची पारितोषिके देऊन त्यांच्या सर्जनशीलतेचा सन्मान केला जातो. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे



अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव परेश ठाकूर, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हा समारंभ होणार आहे, असे मुंबई मराठी पत्रकार संघाचे कार्यवाह शैलेंद्र शिर्के आणि स्पर्धा समन्वयक दीपक म्हात्रे यांनी कळविले आहे.

# खोपोली रेल्वेस्थानकातील गैरसोयींबद्दल भाजप आक्रमक

**खोपोली : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेचे शेवटचे महत्त्वाचे स्थानक खोपोली असून या स्थानकाच्या आवारातील अनेक गैरसोईबाबत वारंवार भारतीय जनता पक्षाने रेल्वे प्रशासनाला विनंती अर्ज करूनही, प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप करीत खोपोली भाजप पदाधिकाऱ्यांनी थेट रेल्वे स्टेशन गाठून स्टेशन मास्तरला जाब विचारला. दरम्यान, अचानक भाजप शिष्टमंडळ स्थानकात आल्याने रेल्वे कर्मचाऱ्यांची धावपळ उडाली आणि त्यांनी थेट पोलिसांना प्राचारण केले. पदाधिकाऱ्यांनी थेट वरिष्ठ अधिकाऱ्यांची फोनवर संवाद साधत येथील अनेक गैर सोयींचा पाढाच वाचला.



खोपोली शहराची दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत असताना, येथून मुंबईला थेट नोकरी व्यवसायासाठी जाणाऱ्यांची संख्या ही वाढत आहे , त्याचप्रमाणे मुंबई व उपनगरातून नोकरी करणाऱ्यांची संख्याही वाढत आहे. शहरात अनेक शासकीय कार्यालय, बँका, शाळा महाविद्यालय, व खाजगी कार्यालयांची संख्याही लक्षणीय आहे. त्यामानाने मुंबईला जाणाऱ्या ट्रेनची संख्या ही अपुरी असून, तसेच रेल्वे स्थानकाच्या परिसराला बकाळ स्वरूप प्राप्त झाले आहे, आजूबाजूला पडलेला कचरा, अनधिकृत टपऱ्या, व पावसाळ्यात चिखलाचे साम्राज्य असते त्यामुळे संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरली असून प्रवाशांना प्रवास करताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अनेकदा वरिष्ठ अधिकारी पुण्याला जाताना कर्जत स्थानकाला भेट देत असतात परंतु खोपोली रेल्वे स्थानकाला त्यांना भेट देण्यास वेळ नाही असाही मुद्दा यावेळी पदाधिकाऱ्यांनी चर्चेदरम्यान सांगितले. याबाबतचे निवेदन यापूर्वी महिला आघाडीतर्फे देण्यात आल्याचे शहराध्यक्ष अश्विनी अत्रे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

रेल्वे प्रशासनाने या समस्या तातडीने सोडवल्या नाही तर भविष्यात खोपोलीकरांच्या वतीने मोठ्या प्रमाणात आंदोलन करावे लागेल, असा इशारा या वेळी देण्यात आला.

या शिष्टमंडळात माजी अध्यक्ष रमेश रेटरेकर, माझी नगरसेवक सूर्यकांत देशमुख, शहर सरचिटणीस अजय इंगुलकर, युवा नेते विक्रम साबळे, युवक अध्यक्ष डॉ. अनिकेत पाटील, कामगार नेते रामभाऊ पवार, सुनील नांदे, सुप्रिया नांदे, गीता मोहिते, संजय म्हात्रे, विभा पाठक, सीमा मोगरे, सौ.गुप्ते, सौ. शहा, प्रल्हाद अत्रे, सचिन मोरे, मयूर रेटरेकर, हिम्मतराव मोरे यासह अनेक पदाधिकारी व प्रवासी उपस्थित होते.

## संमतीशिवाय गर्भपात; तरुणावर गुन्हा दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

प्रेमाच्या जाळ्यात अडकवून लग्न केल्याचा बनाव करत शारीरिक संबंधातून गर्भवती राहिलेल्या तरुणीला जबरदस्तीने गर्भपात करण्यात भाग पडल्याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात तक्का पनवेल येथे राहणाऱ्या तरुणा विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. रिस कांबा येथे राहणारी पीडित तरुणी आणि तक्का पनवेल येथे राहणारा आरोपी तरुण यांची दिड वर्षापासून मैत्री होती. मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाल्यानंतर आरोपी तरुणाने वारंवार शारीरिक संबंधाची मागणी केल्याने पिडितेने लग्न करण्याची अट घातली होती.

आरोपीत याने त्याचे वय १९ वर्षे असताना देखील ते वाढवुन २२ वर्षे सांगुन पिडिते सोबत कायदेशीर विवाह न करता कपटीपणाने विवाह संस्कार श्री समर्थ विवाह मंगल केंद्र कर्जत या ठिकाणी करून घेतल्याचा आरोप पिडितेने केला. त्यानंतर आरोपीने तिला नांदण्यास न नेता तीला माहेरीच ठेवुन तिचेशी तिचे संमतीशिवाय वारंवार शारिरीक संबंध प्रस्थापीत केले. पिडिता गरोदर राहील्याने गर्भपाताच्या गोळ्या देवुन मनाविरुद्ध गर्भपात घडवुन आणला. याबाबत रसायनी पोलीस ठाणे येथे पीडीतेने तक्रार दिली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास महिला पोलीस उपनिरीक्षक ढोंणे करीत आहेत.

# रस्त्याच्या डागडुजीसाठी कर्जतमध्ये ग्रामस्थ एकवटले

**कर्जत : प्रतिनिधी**

पोलीस मित्र संघटना आणि आंबोट, गौळवाडी विभागातील ग्रामस्थांनी रस्त्यावरील खड्ड्यात बसून आंदोलन केले. याची दखल बांधकाम खात्याच्या अधिकाऱ्यांनी घेऊन रस्त्याची डागडुजी करावी; अन्यथा आणखी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्ते मिनेश मसणे यांनी दिला आहे.

कर्जत येथील छत्रपती संभाजी महाराज चौक येथे पोलीस मित्र संघटनेने आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाला गौळवाडी आणि आंबोट गावातील ग्रामस्थांनी पाठिंबा दिल्यावर पोलीस मित्र संघटना आंबोट रस्त्यावर आंदोलन करण्यासाठी पोहचली. आंबोट-गौळवाडी अंतर्गत रस्त्यावर खड्ड्याचे साम्राज्य असल्यामुळे सामाजिक कार्यकर्ते मिनेश मसणे यांच्या पुढाकाराने त्या विभागातील जागरूक ग्रामस्थांनी रस्त्यातील खड्ड्यात बसून आंदोलन केले.

आंबोट-गौळवाडी अंतर्गत रस्त्यावर त्या विभागातील ग्रामस्थ महिला आणि विद्यार्थी हे दिवसभर बसून आंदोलन केले. त्यानंतर ग्रामस्थ आक्रमक झाले असून बांधकाम प्रशासनाने पावले उचलली नाही, तर आणखी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. या आंदोलनात गेल्या तीन महिन्यांपासून खड्ड्यात आंदोलन करणारे पोलीस मित्र संघटनेचे रमेश कदम हेसुद्धा सहभागी झाले होते.




## निवडक

### रिक्षाच्या धडकेत ज्येष्ठ नागरिक जखमी

**पनवेल :** गोल्ड पॅलेस ज्वेलर्स पनवेल येथे रिक्षाचालकाने जोरदार धडक दिल्याने एक ७२ वर्षीय ज्येष्ठ नागरिक गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. गोल्ड पॅलेस ज्वेलर्स पनवेल येथे शंकर जानु भोईर (वय ७२, रा. भातान) हे जात असताना रिक्षा (एमएच ४६ बीडी २६१६) वरील चालकाने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात ते गंभीर झाले आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### धोकादायक इमारतीवर कारवाई

**पनवेल :** महापालिकेच्या प्रभाग समिती ड मार्फत पनवेल सिटी सेंटर, अंतिम भूखंड क्रमांक १९७, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पनवेल ही इमारत धोकादायक



घोषित करण्यात आली होती, परंतु ही इमारत वारंवार सूचना देऊनदेखील रिक्त न केल्याने मा. न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वानुसार सदर इमारतीचे विद्युत पुरवठा व पाणी पुरवठा खंडित करून धोकादायक इमारत रिक्त करण्यात आली. आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार उपायुक्त (अ. बां. नि.) रविकिरण घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली पालिका कर्मचारी, सुरक्षा रक्षक, पोलिस विभाग यांच्या उपस्थितीत जेसीबीच्या साह्याने या इमारतीवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

# बीसीटी लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांची पनवेल जिल्हा न्यायालयाला भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) लॉ कॉलेज ऑफ लॉ च्या प्राचार्य डॉ. संवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहाय्यक प्राध्यापक शिल्पा नागोणकर आणि सहाय्यक प्राध्यापक राघव शर्मा, विषय शिक्षक प्रॅक्टिकल ट्रेनिंग II यांच्या देखरेखीखाली, १६ सप्टेंबर २०२५ रोजी दुसऱ्या वर्षाच्या एलएलबीच्या विद्यार्थ्यांनी पनवेल जिल्हा न्यायालयाची भेट घेतली.

अकादमिक अभ्यासक्रमानुसार, विद्यार्थ्यांना न्यायालयांना भेट देणे आवश्यक आहे, जेणेकरून न्यायालयीन कार्यवाही आणि न्याय वितरण प्रणालीचे प्रत्यक्ष ज्ञान प्राप्त करता येईल.

पनवेल जिल्हा न्यायालय भेट दुसऱ्या वर्षाच्या LL.B. विद्यार्थ्यांसाठी अत्यंत शैक्षणिक अनुभव ठरली. या भेटीद्वारे विद्यार्थ्यांना न्याय प्रणालीची वास्तविकता समजली आणि न्यायापर्यंत सर्वांसाठी पोहोच सुनिश्चित करण्यात कायदेशीर सहाय्य सेवांची महत्वाची भूमिका जाणवली. या भेटीमुळे त्यांच्या प्रत्यक्ष कायदेशीर ज्ञानात वाढ झाली तसेच समाजाप्रती व्यावसायिक जबाबदारीची जाणीव झाली.

पनवेल जिल्हा न्यायालयातील माननीय जिल्हा न्यायाधीश, माननीय न्यायाधीश आणि न्यायालयीन कर्मचारी यांनी भेटीस परवानगी दिल्याबद्दल आणि सहकार्य केल्याबद्दल. जिल्हा कायदेशीर सेवा प्राधिकरण (DLSA), रायगड-पनवेल यांनी कायदेशीर सहाय्य सेवांचे कार्य समजावून सांगल्याबद्दल. आमचे शिक्षक वर्ग आणि कॉलेज व्यवस्थापन यांनी न्यायालय भेट आयोजित केल्याबद्दल आणि मार्गदर्शन केल्याबद्दल मानले.




# भाजपकडून वृक्षारोपण, सेफ्टी किट्स आणि घरगुती गॅस सुरक्षितता उपक्रम



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष, नवी मुंबईच्या वतीने शनिवारी विविध ठिकाणी वृक्षारोपण मल्ल निस्सारण कंत्राटी कर्मचारी यांना सेफ्टी किट्स, घरगुती गॅस सुरक्षा आदि विविध सामाजिक उपक्रम माजी विरोधी पक्ष नेते दशरथ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते.

वृक्षारोपण वाशी रेल्वे स्टेशन परिसर, सानपाडा, सोनखार, जुईनगर येथे भाजप कार्यकर्त्यांसह माजी नगरसेविका फशीबाई भगत यांनी केले. नवी मुंबई महापालिका सेवेतील मल्ल निस्सरण, हिवताप निर्मूलन व पालिका आणि महावितरण विभागातील कंत्राटी कर्मचारी यांना सेफ्टी किट्सचे वाटप करण्यात आले. विशेष उपक्रमाअंतर्गत महिला भगिनींसाठी आर्थिक बचत व गुंतवणूक बाबतीत वित्तीय संस्थाच्या प्रतिनिधीसोबत मार्गदर्शन शिबीर भरविण्यात आले होते.

वाशीत राज्य शासनाच्या कौशल्य विकास मंत्रालयाच्या अधिकारी यांच्या मार्फत महिला स्वयंरोजगार व व्यवसाय मार्गदर्शन शिबीर, दैनंदिन पोषण आहार जागृतीपर शिबीर तसेच महिलांना विशेषतः घरगुती गॅस वापर सुरक्षितता माहिती आणि प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

सर्व सेवाभावी उपक्रम वनमंत्री गणेश नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित पंधरवडा अभिनव उपक्रम अंतर्गत नवी मुंबई मनपा माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांच्या नेतृत्वाखाली युवा नेते निशांत भगत माजी नगरसेविका वैजयंती भगत, रूपाली भगत, संदीप भगत यांनी यशस्वी केले.

# इनरव्हील क्लब ऑफ पनवेलतर्फे शिक्षकांचा सन्मान




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून इनरव्हील क्लब पनवेलच्या वतीने नवीन पनवेल येथील सीकेटी विद्यालयातील शिक्षकांचा सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्यात तसेच समाजाला योग्य दिशा देण्यात शिक्षकांची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याची जाणीव ठेवून हा उपक्रम राबविण्यात आला. या सोहळ्यात सीकेटी विद्यालयातील दहा शिक्षकांचा प्रमाणपत्र देऊन व त्यांच्या कार्याचा गौरव करून सन्मान करण्यात आला.

या वेळी प्रत्येक शिक्षकांना ज्ञानयात्रेचे प्रतीक म्हणून पुस्तक, प्रेरणेचे प्रतीक म्हणून पेन, आनंदाचे प्रतीक म्हणून मिठाई व मंगलमयतेचे प्रतीक म्हणून श्रीफळ प्रदान करण्यात आले. सन्मान स्वीकारताना शिक्षकांनी इनरव्हील क्लबच्या या उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. उपस्थितांच्या मनात आपुलकी, आदर व परस्पर सन्मानाची भावना या कार्यक्रमातून अधिक दृढ झाली. या सोहळ्याची सांगता अल्पोपहार व समूह छायाचित्राने करण्यात आली. शिक्षक हे केवळ ज्ञानदान करणारे नसून विद्यार्थ्यांच्या जीवनाचा पाया रचणारे शिल्पकार आहेत.

विद्यार्थ्यांना योग्य दिशा देऊन समाज घडविण्याचे पवित्र कार्य शिक्षक करतात. त्यामुळे इनरव्हील क्लब पनवेलने शिक्षकांचा सन्मान करत आणखी एक स्त्युत्य उपक्रम यशस्वीपणे राबविला.

# एच.एन. पाटील यांना पुरस्कार

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयाचे उपशिक्षक तसेच सारडे गावचे रहीवाशी एच. एन. पाटील यांना लायन्स क्लब ऑफ उरणच्या वतीने उत्कृष्ट शिक्षक पुरस्काराने सन्मान करण्यात आले.

एच. एन. पाटील हे रयत शिक्षण संस्थेत गेली २६ वर्षे उपशिक्षक म्हणून काम करत आहेत. २५ वर्ष ते विविध शाखेत विद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख म्हणून काम करत आहेत. लायन्स क्लब ऑफ उरण तर्फे शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबरोबरच सामाजिक योगदानाने समाज उजळविणाऱ्या शिक्षकांच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार सोहळा उरण नगर परिषद शाळेत झाला.

उरण तालुक्यातून एकूण १५ शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. एच. एन. पाटील सरांचे अभिनंदन विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्य बी. बी. साळूंखे, उपमुख्याध्यापिका एस. डी. थोरात, पर्यवेक्षिका एस. एम. बाबर, एस. एस. पाटील, प्राध्यापक वर्ग, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.



# लिमये कॉलेजमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालय - आय. क्यू. ए. सी. आणि अखिल भारतीय शैक्षिक महासंघ (ए. बी. आर. एस. एम.) संघटना - मुंबई विद्यापीठ युनिट यांच्या संयुक्त विद्यमाने एन. इ. पी. २०२० : महाराष्ट्रातील सद्यस्थिती व आव्हाने यावर पॅनल डिस्कशन झाले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे डॉ. शेखर चंद्रात्रे सर यांनी मार्गदर्शन केले.



या कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या डॉ. अपर्णा कुलकर्णी यांनी एन. इ. पी. चे ध्येय, वैशिष्ट्य व रचना याबाबत माहिती दिली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रिती महाजन यांनी ABRSMने पुढील काळातही महाविद्यालयात कार्यक्रम घ्यावेतअशा भावना व्यक्त केल्या. आय क्यू ए सी समन्वयक प्रो. डॉ. बबन जाधव यांनी प्रास्ताविक करून भारत महागुरू बनण्यासाठी शैक्षणिक धोरणाचे महत्त्व विशद केले . या कार्यक्रमासाठी सी. के. टी. कॉलेज नवीन पनवेल येथील परीक्षा विभाग प्रमुख डॉ. सुभाष उन्हाळे, एन. एस. एस. प्रमुख डॉ. राजेश येवले, एन. इ. पी. समन्वयक डॉ. निलेश वडनेरे, डी. एल. एल. इ. समन्वयक डॉ. बाळासाहेब पाटील, भावेश भोईर, के. एल. ई. कॉलेजमधून शितल घारगे, मृदूला नायर तर विसपुते कॉलेज नवीन पनवेल येथून आशा सुर्यवंशी, राधिका महाले या प्राध्यापिका उपस्थित होत्या.

महाविद्यालयातील डॉ. स्वाती शिंदे, आरती सावंत, अंकिता जाधव, दीपा पाटील, राणी व्होरकाटे, प्रणाली जाधव, प्रतीक्षा माळी, गिरीश कुंभार, डॉ. दीपा धानोरकर, अर्चना यादव, जोशीला मॅडम, आरती यादव, नीलम सोनावणे, यांनी विद्यार्थ्यांसह आयोजनामध्ये सहभाग घेतला.

पान १ वरुन

## युवाशक्तीच्या जोरावर भारत २०४७ साली विकसित देश होणार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात विकासाचे पर्व आणले. त्या माध्यमातून देशाचे संरक्षण, रोजगार, शिक्षण, व्यवसाय मजबूत करण्याचे काम झाले. त्या अनुषंगाने आत्मनिर्भर भारत, स्वदेशी आणि स्वाभिमानी भारत निर्माण करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. आपल्या शास्त्रज्ञांमध्ये ताकद होती, मात्र व्यवस्था नव्हती, पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बळ दिले आणि क्रांती घडली. मिशन चांद्रयान यशस्वी झाले तसेच एकाचवेळी १०३ सॅटेलाईट अवकाशात झेपवण्याची किमया एकमेव आपल्या देशाने केली. पंतप्रधान झाल्यापासून नरेंद्र मोदी यांनी देशाच्या विकासासाठी विविध योजना अमलात आणल्या.

काँग्रेसच्या काळात होणारा भ्रष्टाचार सर्वांनीच पाहिला आहे. त्यावर उपाय म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योजनेतील दलाल दूर करण्यासाठी लाभार्थीच्या थेट बँकेच्या खात्यात जमा करण्याचे महत्त्वपूर्ण पाऊल उचलले. त्यामुळे मोदी सरकारमुळे लाभार्थीला त्याच्या हक्काचे लाभ मिळायला लागले. अशा अनेक योजनांच्या माध्यमातून तळागाळातील माणसाचा विचार पंतप्रधान मोदींनी केला आहे, असे सांगून मंत्री आशिष शेलार यांनी विकासकामांच्या अनेक उदाहरणांसह देशाच्या जडणघडणीचा विस्तार संवादातून युवकांसमोर मांडला. त्याचबरोबर त्यांनी सोशल मीडिया संदर्भात तरुणांना सतर्कतेचा सल्ला दिला.

देशाचे सजग आणि सतर्क नागरिक बना. जगातील विकसित देशांच्या रांगेत भारत अभिमानाने उभा राहील. त्या वाटचालीत युवकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणूनच प्रत्येक युवक-युवतीने स्वतःचा विकास साधत देशाच्या प्रगतीत हातभार लावावा, असे आवाहन ना. शेलार यांनी संवाद मेळाव्यात केले.

मेळाव्याचे प्रास्ताविक आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देश आणि राज्याच्या विकासासाठी घेतलेल्या निर्णयांचा आणि कार्याचा गौरव व उहापोह केला. त्याचबरोबर मंत्री आशिष शेलार यांनी पीओपी मूर्तिकारांसाठी घेतलेल्या सकारात्मक निर्णयाबद्दल तसेच सण-उत्सवांना समाजाला जोडण्याच्या कार्याबद्दल त्यांचे आभार मानले.

## आरोग्याविषयी नागरिकांमध्ये जागृती -आमदार प्रशांत ठाकूर

राजा भालेकर, उपसरपंच राम पाटील, हनुमान फुलोरे, जयेश पाटील, नितीन मोरे, सुनील दौंड, हेमंत मानकामे, नेरे विभाग प्रमुख विद्याधर चोरघे, अपर्णा पवार, डॉ. आकाश वावेकर, नीलिमा पाटील, वंदना रोडपालकर, दिनेश मानकामे, शैलेश जाधव, कल्पना वाघे, भरत काकडे, राजेश्री पाटील, नितीन पवार यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सवाई गंधर्व महोत्सवात कलाकारांची स्वर मैफल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या सुवर्ण परंपरेला उजाळा देणारा पं. सवाई गंधर्व संगीत महोत्सव कुंदगोल येथील सवाई गंधर्व स्मारक भवन येथे दोन दिवसांच्या भव्य आयोजनात पार पडला. पं. सवाई गंधर्व यांच्या ७३व्या पुण्यतिथीनिमित्त, कर्नाटक सरकारच्या कन्नड व संस्कृती विभागाच्या सहकार्याने आयोजित या महोत्सवाने रसिकांना आनंद दिला. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या गायकांसोबत रायगड नवी मुंबईचे सुपुत्र पं. उमेश चौधरी यांनीही आपल्या शास्त्रीय संगीत गायनाचा ठसा उमटवला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मश्री डॉ. अरविंद काटगी होते. या वेळी जयपूर-अत्रौली घराण्याच्या प्रख्यात गायिका पद्मश्री अश्विनी भिडे-देशपांडे यांना सवाई गंधर्व राष्ट्रीय संगीत पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. पहिल्या दिवशी पद्मश्री अश्विनी भिडे-देशपांडे, विदुषी पद्मिनी राव, पं. उमेश चौधरी, पं. कृष्णचंद्र वाडिकर, विद्वान द्वारकानाथ आणि पं. रतन मोहन शर्मा यांच्या सादरीकरणांनी सभागृह दुमदुमले.

# शाळा, महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या विकासाला चालना

## सीकेटी विद्यालयात संस्थास्तरीय वेशभूषा स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षा निमित्त जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयात संस्थास्तरीय वेशभूषा स्पर्धेचे आयोजन पूर्व प्राथमिक मराठी माध्यम या विभागातर्फे शनिवारी (दि.२०) करण्यात आले.

या स्पर्धेमध्ये संस्थेतील शाळांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आली. पारितोषिक वितरणा





साठी मा.प्राचार्य प्रशांत मोरे, मुख्याध्यापक कैलास सत्रे, मराठी माध्यम विभाग पर्यवेक्षक कैलास म्हात्रे व इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे मॅडम, मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर आदी उपस्थित होते. या सर्वांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

या वेशभूषा स्पर्धेतील सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. या स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमुख अतिथींच्या हस्ते प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्राथमिक विभागाचे सहाय्यक शिक्षक पंढरीनाथ जाधव यांनी केले.

### विजेते स्पर्धक

**प्रथम क्रमांक मनस्वी किशोर जाधव-श्रीमती भागुबाई चांगु ठाकूर विद्यालय द्रोणागिरी, द्वितीय क्रमांक मीरा महेश चौधरी-रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघर, तृतीय क्रमांक कियान महेंद्र ठाकूर-चांगू काना ठाकूर विद्यालय पूर्व प्राथमिक मराठी माध्यम**

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात वेबिनार

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शुक्रवारी (दि.१९) संगणक विभागातर्फे विकास प्रणाली या विषयावर संगणक व माहिती तंत्रज्ञान विभागातील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी वेबिनारचे आयोजन केले होते.

या वेबिनारसाठी प्रमुख वक्ते श्री. के. जी. विनय कुमार सीनियर मॅनेजर युरोफिन्स हे होते तसेच त्यांना विकास कार्यप्रणाली या क्षेत्रात पाच वर्षापेक्षा जास्त अनुभव असून सध्या ते युरोफिन्स या आंतरराष्ट्रीय कंपनीमध्ये कार्यरत आहेत. यावेळी त्यांनी महाविद्यालयातील संगणक व माहिती तंत्रज्ञान विभागातील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना विकास व कार्यप्रणाली या क्षेत्रात करिअरसाठी



असणाऱ्या वेगवेगळ्या संधी आवश्यक कौशल्ये व प्रमुख टूल्स याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले.

बेबीनारचे आयोजन प्रा. सर्वेश महाजन यांनी केले. या वेबिनारच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विकास कार्यप्रणाली या आधुनिक क्षेत्राची स्पष्ट माहिती मिळाली असून त्यांनी आपल्या करिअरची दिशा ठरवण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन मिळाल्याची प्रतिक्रिया दिली. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या वेबिनारचे आयोजन यशस्वीरित्या केल्याबद्दल संगणक विभागातील सर्व प्राध्यापक विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

हे वेबिनार संगणक विभागाच्या प्रमुख प्रा. रिजवाना मोमीन यांच्या मार्गदर्शनात झाले तसेच संगणक विभागातील इतर सर्व शिक्षक, विद्यार्थी शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## गव्हाण विद्यालयात बोर्ड परीक्षा आवेदनपत्र भरण्यास प्रारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन आत्माराम भगत ज्युनिअर कॉलेजमधील इयत्ता दहावी आणि बारावीमधील बोर्ड परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२६ला प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे आवेदन पत्र भरण्याचा शुभारंभ झाला.

विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरूणशेठ भगत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ह्या कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना शैक्षणिक वर्षे शिस्त व अभ्यासात व्यतीत केल्यास उर्वरीत आयुष्य सुखी समाधानी व समृद्ध होते असे प्रतिपादन करून विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाने उत्तुंग यश संपादन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

या वेळी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ




ठाकूर व विश्वनाथ कोळी, ज्येष्ठ नेते जयवंतराव देशमुख, सदानंद देशमुख यांचेसह विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रविंद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख संजय उगले, ज्युनिअर कॉलेज शिक्षक माणिक घरत, अर्चना पाटील, करुणा तांडेल, जयराम सोनटक्के, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, संदीप भोईर, प्रशांत परदेशी, क्रीडा शिक्षक सुरेश पारखे, अन्य शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी प्रातिनिधिक स्वरूपात विद्यार्थ्यांना आवेदन पत्रासोबत गुलाबपुष्प आणि मिठाई भरवून शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सागर रंधवे यांनी केले.

गव्हाण ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच विजय घरत यांनी विद्यालयास DJI Action -4 हा चाळीस हजार रुपये किंमतीचा अत्याधुनिक तंत्रज्ञान युक्त कॅमेरा सप्रेम भेट दिल्याबद्दल विशेष गौरवोद्गारांनी त्यांच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

### देवेंद्र म्हात्रे, सुरेश पारखे यांचा सत्कार

**विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे यांची संस्थेच्या लाईफ वर्कर पदी निवड झाल्याबद्दल आणि माधवबागचा आदर्श जिल्हा शिक्षक पुरस्कार घोषित झाल्याबद्दल तसेच विद्यालयाचे क्रीडा शिक्षक सुरेश पारखे यांच्या सफल क्रीडा मार्गदर्शनाखाली तालुका क्रीडा स्पर्धेत विद्यिर्थ्यांची घवघवीत यश संपादन केल्याबद्दल त्यांचाही कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.**

## सीकेटी विद्यालयात विशेष कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागातर्फे कब बुलबुल विद्यार्थ्यांकरिता विशेष कार्यशाळेचे आयोजन मंगळवारी करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

दरम्यान, संगीत शिक्षक रूपेश मढवी आणि संतोष खरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी प्रार्थना तसेच कब बुलबुल गीताचे सुंदर सादरीकरण केले. ह्या कार्यशाळेसाठी कब बुलबुल विद्यार्थ्यांसह, शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, कब बुलबुल प्रमुख सुरेंद्र ठमके, वर्गशिक्षिका बीना नायर, प्रिया नायर, दयानंद ठाकूर, नीलम पाटील, संगीत शिक्षक रूपेश मढवी, संतोष खरे, प्रिया नायर उपस्थित होते.



## सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयात ओझोन दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दरवर्षी १६ सप्टेंबर हा दिवस जागतिक ओझोन दिन म्हणून संपूर्ण विश्वात साजरा केला जातो. या दिनानिमित्त सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयात जागतिक ओझोन दिवस साजरा करण्यात आला. यलो हाऊसच्या विद्यार्थ्यांनी या संपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी पार पाडली.

या कार्यक्रमाचा विषय जागतिक कृती विज्ञान (Science to Global Action) हा होता. विद्यार्थ्यानी या निमित्ताने ओझोन वायूचा थर व त्याचे महत्व या विषयावर भाषणे दिली. ओझोन वर आधारित कविता सादर केली. विद्यार्थ्यानी ओझोन वर आधारित एक छोटी नाटिका सादर केली. ओझोन वायूचे रक्षण करण्याची व पर्यावरण जपण्याची प्रतिज्ञा विद्यार्थ्यांनी घेतली. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षिका नीरजा अदुरी, गणित शिक्षिका स्मिता भालेकर व नीता बालशी हे उपस्थित होते.

या कार्यक्रमात इयत्ता नववी ब चे विद्यार्थी सहभागी झाले. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



## वीर वाजेकर महाविद्यालयातर्फे सागर किनारा स्वच्छता मोहीम



**उरण : वार्ताहर**

राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना फुंडे कॉलेज व के.डी.एस.कॉलेज, यु.ई एस.महाविद्यालय सागर विचार मंच, कंदळवन फाऊंडेशन सेल रायगड, नागरी संरक्षण सेवा दल उरण फ्रेंड्स ऑफ नेचर यांच्या संयुक्त विद्यमाने उरण येथील नागाव समुद्र किनारी शनिवारी (दि.२०) स्वच्छता करण्यात आली

तीनही महाविद्यालयातून जवळजवळ ३०० विद्यार्थी उपस्थित होते.नागरी सेवादल फ्रेंड्स ऑफ नेचर व इतर सामाजिक संस्थेचे १०० व्यक्ती कांदळवन संरक्षण दलाचे २५ जवान व साईश्वरी मॅडम, नागाव ग्रामपंचायतीचे सरपंच नरेंद्र गायकवाड, म्हातवली ग्रामपंचायतीचे सदस्य यांनी उपस्थित राहून समुद्र किनारा स्वच्छता करण्यात आली. डॉ. आमोद ठक्कर प्रभारी प्राचार्य,वीर वाजेकर कॉलेज, फुंडे यांनी आपल्या मनोगतातून सागर आपल्या भविष्यातील पर्यावरण संवर्धनासाठी व भविष्यातील अन्न सुरक्षितता साठी कसे आवश्यक आहे ते वैज्ञानिक दृष्ट्या विद्यार्थ्यांना, समजावून सांगितले शासनाच्या आदेशापेक्षा आपणच महिन्याच्या दर शनिवारी सागर किनारा स्वच्छता करुयात त्यात सर्वांनी सहभागी होऊया, असे आवाहन केले.

डॉ.दत्ता हिंगमिरे, विभागीय समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा रायगड यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. सागर विकास मंच ह्यांच्या मार्फत हात मोजे, मास्क व अल्पोपहार उपलब्ध करून दिला.

म्हातवली ग्रामपंचायती कचरा संकलनासाठी निकेतन रमेश ठाकूर (फ्रेंड्स ऑफ नेचर सामाजिक संस्था, चिरनेर) यांचेही सहकार्य लाभले. प्रा.राम गोसावी, प्रा.बळीराम पवार कार्यक्रम अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना, फुंडे कॉलेज, महाविद्यालयातील सकाळ सत्रातील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थी उपस्थित होते तसेच सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

## बीसीटी विधी महाविद्यालयात संशोधन सादरीकरण स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी (७५व्या) वाढदिवसाच्या आनंदोत्सवाचा एक भाग म्हणून, भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयाच्या संशोधन मंडळाने प्राचार्य डॉ. सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संशोधन मंडळाच्या प्रभारी व सहाय्यक प्राध्यापिका डॉ. ममता भट्टाचार्य यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी (दि. १९) महाविद्यालयाच्या सभागृहात संशोधन सादरीकरण स्पर्धेचे आयोजन केले.

या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती, चिकित्सक दृष्टिकोन आणि शैक्षणिक उत्कृष्टता विकसित करणे हा होता, तसेच शिक्षण आणि सामाजिक विकास क्षेत्रातील श्री रामशेठ ठाकूर शेठ यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाला आणि अमूल्य योगदानाला आदरांजली वाहणे हादेखील हेतू होता.

मान्यवर परीक्षकांच्या समितीने, ज्यात प्राध्यापक व विषय तज्ज्ञांचा समावेश होता, सादर केलेल्या संशोधन निबंधांचे मूल्यांकन मूळ आशय, विश्लेषणाची खोली, पद्धतीची स्पष्टता आणि सादरीकरण कौशल्य या निकषांवर केले. स्पर्धेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला आणि शैक्षणिक चर्चेला चालना मिळाली, ज्यामुळे सर्व उपस्थितांचा शिकण्याचा अनुभव अधिक समृद्ध झाला.

विजेत्यांची घोषणा करण्यात आली आणि सर्वोत्तम निबंधाला समीक्षित (peer reviewed) जर्नलमध्ये प्रकाशित करण्यासाठी निवडण्यात आले. सर्व सहभागी विद्यार्थ्यांच्या विद्वत्तापूर्ण प्रयत्नांचे व संशोधनातील समर्पणाचे कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाचा समारोप व्यवस्थापन, प्राध्यापकवर्ग आणि संशोधन मंडळाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या आभार प्रदर्शनाची झाला.

संशोधन मंडळाच्या सहकार्याने आयोजित केलेली ही संशोधन सादरीकरण स्पर्धा विद्यार्थ्यांना त्यांची संशोधनक्षमता प्रदर्शित करण्यासाठी एक उत्कृष्ट व्यासपीठ ठरली. शैक्षणिक उत्कृष्टता आणि संशोधनाभिमुख शिक्षणाला चालना देणारा हा कार्यक्रम संस्थेच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून स्मरणात राहील.



## विद्यार्थ्यांच्या विकासासाठी पनवेल इनरव्हील क्लबतर्फे शैक्षणिक ॲप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या पद्धतीने शिक्षण घेता यावे व त्यांचा सर्वांगीण शैक्षणिक विकास साधता यावा या हेतूने इनरव्हील क्लब पनवेलतर्फे नवीन पनवेल येथील सी.के.टी. विद्यालयात 'नवनीत आयडियल स्टडी ॲप' वितरणाचा उपक्रम आयोजित करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत इयत्ता दहावीतील ११३ विद्यार्थी तसेच २ शिक्षकांना या ॲपचा प्रवेश देण्यात आला. दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेषतः तयार करण्यात आलेले हे डिजिटल शिक्षण साधन सर्व विषयांचा सविस्तर अभ्यासक्रम, पुनरावृत्ती व सरावासाठी प्रश्नसंच



तसेच दृकश्राव्य माध्यमातून प्रत्येक विषयाचे स्पष्टीकरण अशा वैशिष्ट्यांनी समृद्ध आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांच्या शिकण्यातील तफावत भरून काढणे, शैक्षणिक कामगिरी सुधारण्यास मदत करणे व महागड्या शिकवणीवरील अवलंबित्व कमी करून दर्जेदार अध्ययनसामग्री कुठेही व कधीही उपलब्ध करून देणे हा आहे.

सीकेटी विद्यालयाचे व्यवस्थापन, शिक्षकवृंद तसेच विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत करून इनरव्हील क्लब पनवेलचे आभार मानले.

## विजय भोईर, विकास भोईर यांचा अभीष्टचिंतन सोहळा

**उरण : वार्ताहर**

रायगड जिल्हा परिषदेचे विद्यमान सदस्य विजय भोईर आणि विकास भोईर यांचा आभिष्ठचिंतन सोहळा निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवारी सकाळी ७ ते ११ वाजता जेएनपीटी टाऊनशिप उरण येथे रायगड मर्यादित मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात येणार आहेत. सकाळी १०ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत किक बॉक्सिंग चॅम्पियनशिप (महाराष्ट्र स्टेट लेव्हल) मल्टीपर्पज हॉल जेएनपीटी, उरण येथे होणार आहे. सायंकाळी ५ ते ६ उरण तालुक्यातील गुणवंत डॉक्टर यांचा विशेष सत्कार होणार आहे. उद्घाटक आमदार महेश बालदी उपस्थित राहणार आहेत.

सोमवार (दि. २२ ) रोजी सायंकाळी ७.३० वाजता वाढदिवस अभीष्टचिंतन सोहळा बँक ऑफ महाराष्ट्र नवघर, उरण येथे साजरा होणार आहे.

मुख्य आयोजन स्टॉर्म फिटनेस क्लब उरण असून आयोजक विजय विकास सामाजिक संस्था, भारतीय जनता पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ते उरण तालुका, ग्रामस्थ मंडळ नवघर, मोर्निंग वॉक ग्रुप जेनपीटी आहेत.

## रोडपाली भागात डेब्रिज टाकणाऱ्या गाडीचालकावर दंडात्मक कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या स्वच्छता निरीक्षकांनी रोडपाली परिसरात डेब्रिज उतरवत असताना गाडी पकडून संबंधित चालकावर दंडात्मक कारवाई केली आहे. या चालकास पाच हजार रुपये दंड करण्यात आला आहे.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ भारत अभियान महापालिका कार्यक्षेत्रात राबविले जात आहे. स्वच्छ भारत अभियानाच्या उद्दिष्टांनुसार शहरात स्वच्छता राखण्यासाठी पालिकेचे सफाई कर्मचारी सातत्याने काम करीत असतात. या पार्श्वभूमीवर ही




कारवाई अत्यंत महत्त्वाची आहे.

पालिकेच्या प्रभाग क्रमांक ७, रोडपाली विभागातील सेक्टर १७ येथे गाडीतून डेब्रिज उतरवित असताना स्वच्छता निरीक्षक हरेश कांबळे, दिघ्नेश भोईर व अमित जाधव यांनी गाडी पकडली. संबंधित चालकावर डेब्रिज टाकल्याबद्दल दंडात्मक कारवाई करून पाच हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. या वेळी पालिकेचे सुपरवायझर व कर्मचारी उपस्थित होते.

शहरात सार्वजनिक ठिकाणी, सर्वत्र स्वच्छता राखण्यासाठी नागरिकांनी महापालिकेच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारचा कचरा सार्वजनिक ठिकाणी न टाकता तो योग्य पद्धतीने कचरा कुंडीत टाकावा, असे आवाहन उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी महापालिकेच्या वतीने केले आहे.

# एक शुक्रवार अन् दोन, तीन मराठी चित्रपट!







झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

एकाच शुक्रवारी दोन वा तीन चार मराठी चित्रपट प्रदर्शित झाले की हमखास त्यावरून उलटसुलट चर्चा होणं अगदी स्वाभाविक. आताही असेच दशावतार; बिन लग्नाची गोष्ट व आरपार असे तीन मराठी चित्रपट प्रदर्शित झाले आणि त्यावर चर्चा झाली. सुदैवाने हे सर्व चित्रपट लोकप्रिय ठरलेत आणि मराठी चित्रपटसृष्टीत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

**नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी 'जिवाचा सखा आणि 'गरिबांचे राज्य'**

एकाच शुक्रवारी दोन वा तीन चार मराठी चित्रपट प्रदर्शित होणे अजिबात नवीन नाही. यापूर्वीदेखील घडलेय... नवीन वर्षाचा पहिलाच दिवस. नवीन उत्साह, नवीन उर्जा. नवीन आशा आणि त्याच दिवशी दोन मराठी चित्रपट प्रदर्शित असा योग. १ जानेवारी १९४९ हा तो दिवस. त्या दिवशी राजा परांजपे दिग्दर्शित जिवाचा सखा आणि मा. छोटू व शं.वि. तुंगे दिग्दर्शित गरिबांचे राज्य हे दोन मराठी चित्रपट प्रदर्शित झाले. मंगल पिक्चर्स या बॅनरखाली निर्माण झालेला राजा परांजपे दिग्दर्शित जिवाचा सखा हा चित्रपट मुंबईत मॅजेस्टीक (गिरगाव) येथे प्रदर्शित झाला. हा चित्रपट ७ डिसेंबर १९४८ रोजी सेन्सॉर संमत झाला. मुंबईनंतर पुणे शहरात हा चित्रपट २५ जानेवारी १९४९ रोजी मिनर्व्हा चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. चित्रपटाचे निर्माते वामनराव कुलकर्णी आणि विष्णुपंत चव्हाण हे आहेत. म.मा. भोसले यांच्या 'उघड्या जगात' या कादंबरीवर आधारीत हा चित्रपट आहे. चित्रपटाची पटकथा, संवाद व गीते ग.दि. माडगूळकर यांची असून संगीत सुधीर फडके यांचे आहे. छायाचित्रण वसंत बेलतंगडी यांचे असून संकलन राजा ठाकूर यांचे आहे.

जिवाचा सखा या चित्रपटात जयराम शिलेदार, सुलोचना, दादा साळवी, सरोज बोरकर, विष्णुपंत जोग, राजा परांजपे, शकुंतला जाधव, चंद्रकांत गोखले, पुष्पा आंबेडकर, रवींद्र, सुबोधिनी, धुमाळ, वसंत शिंदे यांच्या प्रमुख भूमिका आहेत. या सामाजिक चित्रपटाची निर्मिती प्रभात फिल्म कंपनी, पुणे येथे झाली. विशेष उल्लेखनीय गोष्ट, राजा परांजपे, सुधीर फडके आणि ग.दि. माडगूळकर या त्रयीचा हा पहिला चित्रपट. 'जिवाचा सखा'पासून जमलेले हे त्रिकूट १९६९च्या आधार या चित्रपटापर्यंत एकत्र होते, पण आता सुधीर फडके आणि ग.दि. माडगूळकर यांच्यातील सलोखा काही कारणास्तव संपला होता. हे दोघे दादरच्या शंकर निवासमध्ये शेजारी शेजारी राहत. अगोदर माडगूळकर यांची खोली आणि मग सुधीर फडके यांची खोली. त्यामुळेच सुधीर फडके यांच्याकडे कोण आले हे सुधीर फडके यांना समजत असे. 'आधार'नंतर राजा परांजपे हे दिग्दर्शनापासून दूर झाले आणि त्यांनी अभिनयावर लक्ष केंद्रित केले.

मयूर पिक्चर्स लिमिटेडच्या शं.वि. तुंगे आणि प्र.व्यं. सोहनी निर्मित गरिबांचे राज्य या चित्रपटाची कथा वि.म. कुलकर्णी यांची असून पटकथा व संवाद ग.ल. ठोकळ यांचे आहेत. बाबूराव गोखले यांच्या गीतांना दादा चांदेकर यांचे संगीत आहे. या चित्रपटात मा. छोटू, मा. विठ्ठल, कुमार विजय, उषा मंत्री, चित्तरंजन कोल्हटकर, बेबी देशपांडे यांच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटात एकूण दहा गाणी आहेत हे विशेषच.

**'भाग्यलक्ष्मी' व 'क्षण आला भाग्याचा' एकाच शुक्रवारी**

मराठीत सामाजिक चित्रपटांची खूपच मोठी परंपरा आहे. पूर्वीचे सामाजिक सांस्कृतिक वातावरण, कौटुंबिक नातेसंबंध तसेच होते आणि त्या काळाला अनुसरून पूर्वी मराठी चित्रपट निर्माण होत. ऐन श्रावणात म्हणजेच २६ ऑगस्ट १९६२ रोजी मुंबईत सागर चित्र निर्मित क्षण आला भाग्याचा हा चित्रपट गिरगावातील सेन्ट्रल चित्रपटगृह आणि दादर येथील प्लाझा चित्रपटगृहात, तर अनंत चित्र निर्मित भाग्यलक्ष्मी चित्रपट लालबाग येथील भारतमाता चित्रपटगृहात प्रदर्शित झाले. क्षण आला भाग्याचा या चित्रपटाचे निर्माते दत्ता कुलकर्णी होते, तर दिग्दर्शन दत्ता धर्माधिकारी यांचे आहे. कथा पटकथा व संवाद मधुसूदन कालेलकर यांचे आहेत. गीते मधुकर जोशी यांची असून संगीत राम कदम यांचे आहे. या चित्रपटात राजा परांजपे, सुमती गुप्ते, रमेश देव, वंदना, उमा बाळकराम, राम टिपणीस, मधु आपटे, धुमाळ यांच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटातील आला गं आला श्रावण महिना हे गाणे लोकप्रिय ठरले. विशेष उल्लेखनीय गोष्ट ऊन पाऊस' या चित्रपटानंतरचा राजा परांजपे व सुमती गुप्ते या जोडीचा हा चित्रपट आहे. ऊन पाऊस या चित्रपटाच्या अगोदर मराठी चित्रपटात तरुणाईच्या गोष्टी असत. ऊन पाऊसने म्हातारपण दाखवले. म्हातारपणातील सुख दु:ख, मुले व सूनांकडून येणारे अनुभव अशी गोष्ट त्यात दाखवली आणि ती प्रेक्षकांना आवडली.

भाग्यलक्ष्मी या चित्रपटाचे निर्माते व दिग्दर्शक अनंत माने यांचे आहे. या चित्रपटाची कथा ना.ग. करमरकर यांची असून पटकथा व संवाद व्यंकटेश माडगूळकर यांची आहे. शांता शेळके यांच्या गीताना राम कदम यांचे संगीत आहे. या चित्रपटात जयश्री गडकर, रमेश देव, सुमती गुप्ते, लता काळे, दामूअण्णा मालवणकर, इंदिरा चिटणीस, विवेक, राजा गोसावी, शरद तळवळकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटातील जयदेवी मंगळागौरी हे गाणे लोकप्रिय ठरले. भाग्यलक्ष्मी या चित्रपटाचे विशेष म्हणजे दिग्दर्शक अनंत माने यांना जयश्री गडकर गुरूस्थानी मानत. अनंत माने दिग्दर्शित १९५९ सालच्या 'सांगते ऐका'पासून १९७५च्या 'पाच रंगाची पाच पाखरे' या चित्रपटापर्यंत अशा वीस चित्रपटात जयश्री गडकर यांनी भूमिका साकारली. जयश्री गडकर अनंत माने यांच्याबद्दल म्हणाल्या होत्या, त्यांच्यातील समर्थ दिग्दर्शकाची, त्यांच्या प्रतिभेची चांगली ओळख झाली होती. त्यांना नेमके काय हवे हे मी जाणून होते. माझ्या गाजलेल्या बहुसंख्य चित्रपटाचे माने हेच दिग्दर्शक आहेत असे जयश्री गडकर यांचे म्हणणे होते.

**'एकटा जीव सदाशिव' व 'पिंजरा' पुणे शहरात एकाच शुक्रवारी प्रदर्शित**

दादा कोंडके यांचा सोंगाड्या (१९७१) नंतरचा चित्रपट एकटा जीव सदाशिव आणि हा चित्रपट ३१ मार्च १९७२ रोजी पुणे शहरातील अलका थिएटरमध्ये प्रदर्शित झाला. याच तारखेला पुणे शहरात चित्रपती व्ही. शांताराम निर्मित आणि दिग्दर्शित पिंजरा प्रभात थिएटरमध्ये प्रदर्शित झाला. या दोन्ही चित्रपटांना रसिकांनी पहिल्याच शोपासून हाऊसफुल्ल गर्दीत प्रतिसाद दिला. 'सोंगाड्या'ची कथा पटकथा संवाद लिहिणारे वसंत सबनीस यांनीच 'एकटा जीव सदाशिव'चे लेखन केले आहे. 'सोंगाड्या'चेच दिग्दर्शक गोविंद कुलकर्णी यांनीच या चित्रपटाचे दिग्दर्शन केले. 'सोंगाड्या'प्रमाणेच याही चित्रपटाचे शूटिंग कोल्हापुरातील जयप्रभा स्टुडिओत झाले. 'सोंगाड्या'चेच नायक आणि नायिका अर्थात दादा कोंडके आणि उषा चव्हाण तसेच नायकाची आई रत्नमाला यांच्या या चित्रपटातही भूमिका. यासह या चित्रपटात गुलाब कोरगावकर, सुमन जगताप, मधु आपटे, शरद तळवळकर, बिपीन तळपदे, सरोज सुखटणकर, बी. माजनाळकर, भालचंद्र कुलकर्णी, गुलाब मोकाशी, मधु भोसले, वसंत खेडेकर इत्यादींच्या भूमिका आहेत. या चित्रपटात चार गाणी असून ती दादा कोंडके आणि जगदीश खेबूडकर यांनी लिहिली असून संगीत राम कदम यांचे आहे. जयवंत कुलकर्णी आणि उषा मंगेशकर यांनी ही गाणी गायली आहेत. नग चालूस दुडक्या चाली, लबाड लांडग ढोंग करतेय, काल रातिला सपान पडलं, वर आभाळ खाली धरती ही ती गाणी आहेत. या चित्रपटाचे कला दिग्दर्शन सदाशिव गायकवाड, छायाचित्रण शंकरराव सावेकर आणि संकलन एन.एस. वैद्य यांचे आहे. त्या काळात टप्प्याटप्प्याने चित्रपट प्रदर्शित होत.

'पिंजरा' मुंबईत १४ एप्रिल १९७२ रोजी प्रदर्शित झाला, तर 'एकटा जीव...' मुंबईत १९७२ नोव्हेंबर महिन्यात प्रदर्शित झाला. तोपर्यंत पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली सातारा इचलकरंजी इत्यादी अनेक ठिकाणी टप्प्याटप्प्याने चित्रपट प्रदर्शित होत आपली लोकप्रियता वाढवत राहिला. 'एकटा जीव...'ची दिग्दर्शक महेश मांजरेकरने 'जिस देश मे गंगा रहता है' या नावाने रिमेक केली. त्यात गोविंदा आणि सोनाली बेंद्रे यांच्या प्रमुख भूमिका आहेत, पण या चित्रपटाला मूळ चित्रपटाची रंगत आली नाही. याचे कारण म्हणजे, 'एकटा जीव...'मधील दादा कोंडके यांच्या भाबड्या व्यक्तिरेखा व धांदरटपणा यांच्याशी प्रेक्षक जोडले गेले आणि चित्रपट आवडला. अर्थातच, तेव्हा चित्रपट रसिकांनी 'पिंजरा' आणि 'एकटा जीव सदाशिव' हे दोन्ही चित्रपट पुन्हा पुन्हा पाहिले... आजही हे दोन्ही चित्रपट पुन्हा पुन्हा पहावेसे वाटतात.

मराठी चित्रपटसृष्टीच्या यशस्वी आणि चौफेर वाटचालीतील माईलस्टोन म्हणून ओळखला जात असलेला चित्रपट म्हणजे व्ही. शांताराम प्रॉडक्शन्सचा 'पिंजरा'. त्याचा आशय, सादरीकरण, अभिनय, गीत संगीत व नृत्य यांच्या गुणांवर या चित्रपटाने प्रचंड लोकप्रियता संपादली. या चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक आणि संकलक चित्रपती व्ही. शांताराम हे आहेत. मराठी चित्रपटसृष्टीतील पहिला यशस्वी रंगीत सिनेमा म्हणूनसुद्धा पिंजरा या चित्रपटाची विशेष ओळख आहे. 'पिंजरा'.. त्यो कुनाला चुकलाय? अवो मानसाचं घरतरी काय असतं? त्योबी एक पिंजराच की, हे तत्त्वज्ञान आपल्या रांगड्या भाषेत सांगणारी तमाशातील एक नर्तकी आणि 'व्यक्ती मेली तरी चालेल समाजातील आदर्श जिवंत राहिले पाहिजेत' या महान तत्त्वावर श्रद्धा असलेला एक माणूस या दोघांच्या संघर्षाची कथा 'पिंजरा' चित्रपटात अतिशय उत्कटतेने आणि प्रभावीपणे साकारलीय. चंद्रकला (संध्या) आणि गुरुजी (डॉ. श्रीराम लागू) यांच्यावर चित्रीत झालेले प्रत्येक दृश्य आणि संवाद सिनेरसिकांच्या आजही लक्षात आहे. प्रत्येकाच्या मनःपटलावर पिंजरा कलाकृतींच एक वेगळंच स्थान आहे. डॉ. श्रीराम लागू, संध्या, निळू फुले, वत्सला देशमुख यांच्या यांनी आपल्या अभिनयाने हा चित्रपट उंचीवर नेऊन ठेवला. या कलाकारांसोबतच या चित्रपटात माणिकराज, गोविंद कुलकर्णी, कृष्णकांत दळवी, सरला येवलेकर, आबू, भालचंद्र कुलकर्णी, बर्चीबहाद्दर इत्यादींच्याही भूमिका आहेत. या चित्रपटाची कथा आणि पटकथा अनंत माने यांची आहे, तर संवाद शंकर पाटील यांचे आहेत.

'पिंजरा' ही एका तत्वनिष्ठ व ब्रम्हचारी शिक्षकाची केवळ एका वारांगनेच्या क्षणीक मोहाच्या पिंजऱ्यात अडकून झालेल्या त्याच्या नैतिक, आत्मिक व सामाजिक अध:पतनाची कथा आहे. या चित्रपटातील गीते जगदीश खेबूडकर यांची आहेत, तर संगीत राम कदम यांचे आहे. या चित्रपटातील आली ठुमकत नार, दे रे कान्हा चोळी आणि लुगडी, छबीदार छबी मी तोऱ्यात उभी, तुम्हावर केली मी मर्जी बहाल, मला इष्काची इंगळी डसली, दिसला गं बाई दिसला, कशी नशिबानं थट्टा आज मांडली ही आणि अन्य सर्व गाणी/लावण्या आजही लोकप्रिय आहेत. रसिकांच्या किमान तीन पिढ्या ओलांडूनही ही गाणी आणि चित्रपट लोकप्रिय आहे. या चित्रपटाचे छायाचित्रण शिवाजी सावंत यांचे, कला दिग्दर्शन बाबूराव जाधव, नृत्य दिग्दर्शन रंजन साळवी यांचे आहे. चित्रपटाचे सगळे शूटिंग कोल्हापूरच्या शांतकिरण स्टुडिओत झाले. पुणे शहरानंतर टप्प्याटप्प्याने मुंबई, कोल्हापूर, सांगली, सातारा इत्यादी अनेक शहरात, ग्रामीण भागात हा चित्रपट प्रदर्शित होत गेला.

'पिंजरा'च्या खणखणीत यशानंतर मराठीत रंगीत चित्रपटांचे युग हळूहळू मुरत गेले तरी वर्षभरातील सगळेच मराठी चित्रपट रंगीत होण्यास जवळपास एक दशक लागले. 'पिंजरा'च्या अगोदर व्ही. शांताराम यांनीच १९६५ साली इथे मराठीचिये नगरी या चित्रपटाचे चित्रिकरण इस्टमनकलर या रंगसंगतीनुसार केले होते, पण या चित्रपटाला रसिकांनी नाकारले.

---

# राष्ट्रनेत्याच्या जन्मदिनापासून राष्ट्रपित्याच्या जयंतीपर्यंत सेवा पंधरवडा



महसूल विभाग हा जनतेच्या दैनंदिन समस्या आणि जिव्हाळ्याच्या विषयांशी निगडीत असल्याने सामान्य जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक असण्याला प्राधान्य देण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १७ सप्टेंबर या जन्मदिनापासून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या २ ऑक्टोबर या जयंतीपर्यंत मोहीम स्वरुपात सेवा पंधरवडा राबविण्यात येत आहे.

महसूली क्षेत्रीय कार्यालयाकडून जनतेस सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी २०२५-२६ या वर्षात मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन १७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सेवा पंधरवडा साजरा करण्यात येणार आहे. या पंधरवड्यात राबविण्यात येणारे कार्यक्रम हे यापूर्वीच राबविण्यात येत असून पंधरवड्यादरम्यान व त्यानंतरही निरंतरपणे राबविले जाणारे कार्यक्रम आहेत. तथापि, या कालावधीत ते मोहीम स्वरुपात युद्धपातळीवर राबविले जात आहेत.

तीन टप्प्यांमध्ये राबविण्यात येणाऱ्या या अभियानामध्ये १७ ते २२ सप्टेंबर या कालावधीतील पहिल्या टप्प्यामध्ये पाणंद रस्तेविषयक मोहीम राबविण्यात येत आहे. २३ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर या दुसऱ्या टप्प्यामध्ये सर्वांसाठी घरे या उपक्रमासाठी पूरक उपक्रम राबविले जातील, तर २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या अंतिम टप्प्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांमार्फत स्थानिक परिस्थितीचा विचार करून नावीन्यपूर्वक उपक्रम राबविले जातील.

**पाणंद रस्ते**

शेतात जाण्यासाठी, शेतमालाची ने-आण करण्यासाठी शेतरस्त्यांच्या निर्मितीसाठी विविध योजनांच्या निधीचा समन्वय साधून समग्र योजना आणली जाणार आहे. यापुढे शेतरस्ता किमान ३ ते ४ मीटर रुंदीचा करण्यात येऊन जमाबंदी आयुक्त यांच्या माध्यमातून शेतरस्त्यांना क्रमांक दिले जाणार आहेत. ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्कांमध्ये शेत रस्त्याची नोंद झाल्यामुळे त्या रस्त्याची कायदेशीर वैधता स्थापित होऊन भविष्यात शेतरस्त्यांच्या वादांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.

या अनुषंगाने सेवा पंधरवड्याच्या पहिल्या टप्प्यामध्ये ग्रामीण रस्त्यांच्या सीमांकनाबाबत महसूल विभागाच्या २९ ऑगस्ट २०२ च्या शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. याचबरोबर शिव पाणंद रस्त्यांचे सर्व्हेक्षण करणे, ज्या पाणंद रस्त्यांची नोंद निस्तार पत्रक/वाजिब उल अर्ज मध्ये करण्यात आलेली नाही त्याची नोंद घेण्याबाबत कार्यवाही करणे, शेतावर जाण्यासाठी रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी संमती पत्र घेणे, रस्ता अदालत आयोजित करून शेतरस्त्यांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे, शेतरस्त्यांची मोजणी व सीमांकन करणे आदी कामे करण्यात येत आहेत.

**सर्वांसाठी घरे**

सेवा पंधरवड्याच्या २३ ते २७ सप्टेंबर या कालावधीतील दुसऱ्या टप्प्यात सर्वांसाठी घरे या उपक्रमांतर्गत घरे बांधण्यासाठी निर्बाध्यरित्या वाटपास उपलब्ध असलेली शासकीय जमीन कब्जेहक्काने प्रदान करण्यात येईल. या उपक्रमासाठी अस्तित्वातील रहिवासी प्रयोजनासाठी असलेली शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमातील तरतुदीनुसार नियमानुकूल करण्यात येतील. या मोहिमेंतर्गत महसूल विभागाच्या १४ डिसेंबर १९९८च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार आरक्षण विकास आराखड्याशी सुसंगत असल्यास शहरातील जमिनीवरील गायरान नोंदी कमी करून त्या जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल केली जातील तसेच आरक्षण विकास आराखड्याशी सुसंगत नसल्यास अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी आरक्षण बदलाचे प्रस्ताव सादर करण्यात येतील. या टप्प्यामध्ये सर्वांसाठी घरे योजनेंतर्गत शासकीय जमिनी वाटप केलेल्या/अतिक्रमण नियमानुकूल केलेल्या लाभार्थ्यांना जमिनींचे पट्टे वाटप केले जातील.

**नाविन्यपूर्ण उपक्रम**


अभियानाच्या तिसऱ्या टप्प्यात २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांमार्फत स्थानिक गरजा, भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जाणार आहेत.

राष्ट्राच्या पुनरूत्थानासाठी समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या दोन महनीय व्यक्तींच्या जन्मदिन व जयंतीचे औचित्य साधून त्या दरम्यानच्या पर्वात हे अभियान राबविले जाणार असल्याने याचे पावित्र्य राखण्यासाठी तसेच नागरिकांना महसूल विभागाच्या सेवांचा लाभ जलदगतीने मिळवून देण्यासाठी यंत्रणेतील प्रत्येक घटक प्रयत्नांची पराकाष्टा करणार आहे हे निश्चित.

**-ब्रिजकिशोर झंवर,**
वरिष्ठ सहायक संचालक,
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय

---

# शास्त्रीय गायक व संगीताचे अभ्यासक पं. जितेंद्र अभिषेकी



एक चतुरस्त्र गायक, संगीतकार व संगीतज्ञ अशी पं. जितेंद्र अभिषेकी यांची ओळख राहिली आहे. त्यांची आज जयंती. मूळ नाव गणेश व आडनाव नवाथे, पण मंगेशी देवस्थानातील पूजा व अभिषेक सांगणारे भिकाजी तथा बाळुबुवा यांचे पुत्र म्हणून आडनाव अभिषेकी झाले.

अभिषेकींचा जन्म २१ सप्टेंबर १९२९ रोजी गोव्यातील मंगेशी येथे झाला. त्यांचे वडील भिकाजी कीर्तनकार होते. वडिलांना कीर्तनात लहानपणी साथ केल्याने स्वर, ताल, लय व उच्चार यांची त्यांना चांगली जाण आली. संगीताचे सुरुवातीचे धडे त्यांनी जितेंद्रांना दिले. संगीताबरोबर संस्कृत भाषाही त्यांना शिकविली. बांदिवड्याच्या गिरिजाबाई केळेकर या त्यांच्या पहिल्या गुरू. शालेय शिक्षणासाठी १९४३ साली ते पुण्यात आले. १९४९मध्ये ते शालांत परीक्षा उत्तीर्ण झाले. मराठी, कोंकणी, पोर्तुगीज, इंग्रजी आदी भाषा त्यांना अवगत होत्या. पुण्यात नरहरबुवा पाटणकर व यशवंतराव मराठे यांच्याकडे ते गाणे शिकले. तेथून ते बेळगावला गेले व तेथे पेटीवादक विठ्ठलराव कोरगावकरांकडून त्यांनी संगीताचे काही धडे घेतले. पुढे भवन्स कॉलेज, मुंबई येथून संस्कृत विषय घेऊन ते बीए झाले (१९५२).

पुढे अभिषेकी हे मुंबई आकाशवाणी केंद्रात कोंकणी विभागात संगीत संयोजक म्हणून ते रूजू झाले (१९५२). नोकरी करीत असतानाच उस्ताद अझमत हुसेन खाँसाहेब यांच्याकडून गायनाचे मार्गदर्शन घेण्याची संधी त्यांना मिळाली. शास्त्रीय संगीताच्या अभ्यासासाठी भारत सरकारची शिष्यवृत्ती मिळाल्यानंतर (१९५९) ज्येष्ठ गायक जगन्नाथबुवा पुरोहित (गुणीदास) यांच्याकडून त्यांना दीर्घकाळ तालीम मिळाली. याबरोबरच अभिषेकी यांनी निवृत्तीबुवा सरनाईक, रत्नाकर पै, अझिझुद्दीन खाँ, मास्टर नवरंग, केसरबाई बांदोडकर इत्यादींकडून मार्गदर्शन घेऊन आपली गायकी अधिक समृद्ध केली. त्यानंतर त्यांनी गुलुभाई जसदनवालांकडून जयपूर घराण्याच्या गायकीची काही वैशिष्ट्ये आत्मसात केली. विविधांगी व्यासंगामुळे आपली अशी स्वतंत्र शैली त्यांनी निर्माण केली. गमकयुक्त स्वरावली, प्रतिमेचा स्वतंत्र आविष्कार, उत्कट, भावनापूर्ण आणि सौंदर्यप्रधान प्रस्तुती, रागभावाला आणि रागस्वरूपाला योग्य स्वराकृती देत केलेले आम आणि अनवट रागांचे गायन आदी गोष्टींमुळे त्यांचे सादरीकरण अविस्मरणीय होत असे.

भावपूर्ण आवाजातील सुंदर व संथ अशी आलापी, मोकळा, स्वच्छ व दीर्घकाळ लावलेला षडज्, अप्रतिम लयकारी, आग्रा गायकीची वैशिष्ट्ये दाखविणारी बोलबनावाची पखरण आणि मग आक्रमक गायकीचा प्रभावी आविष्कार, शब्दांची फेक, भरपूर दमसास व त्याच दमसासाने जाणारी तनाईत ही त्यांच्या ख्यालगायकीची गुणवैशिष्ट्ये होत. मैफलीत ते विशेषकरून अनवट रागांतील (उदा. खोकर, जैत, चारुकेशी, कौंसगंधार, मिश्र शिवरंजनी इत्यादी) नवनव्या बंदिशी सादर करीत असत. 'श्यामरंग' या टोपणनावाने त्यांनी विविध रागात बंदिशी केल्या.

अभिषेकी अगदी सहजपणे नाट्यगीते, अभंग, भावगीत, ठुमरी, दादरा, कजरी, टप्पा आदी उपशास्त्रीय प्रकार रंगवीत. स्पष्ट उच्चारण पद्धतीने विशिष्ट शैलीत ते अभंग म्हणत. त्यांची अभंग गायनाची पद्धती चित्तवेधक होती. त्यांच्या या गायनात वारकरी संप्रदायाप्रमाणे नामसंकीर्तनाची छटा अधिक असे. ते नाट्यगीते शांत, सुंदर व एका विशिष्ट्य लयीत आणि अर्थानुकूल चालीत म्हणत.

नाट्यसंगीत दिग्दर्शक म्हणून त्यांनी केलेली कामगिरी मोलाची असून तीमुळे मराठी नाट्यसंगीताला मनोहारी वळण मिळाले. अभिषेकी यांनी मत्स्यगंधा, ययाती, देवयानी, कट्यार काळजात घुसली, हे बंध रेशमाचे, धाडिला राम तिने का वनी, लेकुरे उदंड जाहली इत्यादी सतरा नाटकांतील पदांना सुरेल चाली लावल्या. हे करताना त्यांनी जुन्या पारंपरिक रागांऐवजी नवीन रागांमध्ये (उदा. गावती, बिहागडा इत्यादी) चाली गुंफल्या आहेत. पद गाणाऱ्या गायकाच्या गळ्याला साजेल अशा रीतीने या चाली दिलेल्या आहेत. वृंदगानाचाही प्रयोग त्यांनी केला होता. त्यात चाळीस गायक-गायिकांनी नोमतोम, धृपद, धमार, मध्यलयीतील ख्याल, ठुमरी, टप्पा, लोकगीते व तराणा हे प्रकार सादर केले होते. त्यांच्या सर्व प्रकारच्या गाण्यांच्या ध्वनिमुद्रिका निघाल्या आहेत.

अभिषेकी यांनी लोणावळा या गिरीस्थानात गुरुकुल पद्धतीने सुमारे दहा वर्षे संगीताचे शिक्षण दिले. पुढे पुण्यात स्थायिक झाल्यावरही (१९८७) त्यांनी काही शिष्यांना गुरुकुल पद्धतीने संगीत शिक्षण दिले. शिवाय त्यांनी 'तरंगिणी प्रतिष्ठान' हा विश्वस्त न्यास स्थापण्यात पुढाकार घेतला. होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, वृद्ध कलावंतांना मदत आदींसाठी हा निधी होता. होमी भाभा संशोधन केंद्राकडून 'लोकनाट्यातील संगीत' या विषयावरील संशोधनासाठी त्यांना शिष्यवृत्ती मिळाली होती. त्याद्वारे त्यांनी प्रदेशपरत्वे कुडियाट्टम, मोहिनीआट्टम्, कथकळी, माच, नौटंकी, दशावतार इत्यादी लोकनाट्यातील संगीताचा अभ्यास केला. पं. रविशंकर यांच्याबरोबर ते १९७०मध्ये अमेरिकेस गेले, तेथे सुमारे पाच ते साडेपाच महिने त्यांनी 'किन्नरम' या त्यांच्या संस्थेत विद्यादानाचे कार्य केले.

पं. जितेंद्र अभिषेकी यांच्या पत्नीचे नाव विद्यावती असून त्यांना शौनक व मेखला ही दोन अपत्ये आहेत. त्यांचे पुत्र शौनक अभिषेकी व त्यांचे शिष्य प्रभाकर कारेकर, राजा काळे, अजित कडकडे, शुभा मुद्गल, आशा खाडीलकर, सुधाकर देवळे, देवकी पंडित, अरुण आपटे, विनोद डिग्रजकर, हेमंत पेंडसे, मोहन दरेकर, रघुनाथ फडके, विजय कोपरकर, समीर दुबळे, महेश काळे आदी त्यांची गानपरंपरा पुढे नेत आहेत.

पं. जितेंद्र अभिषेकी गोवा कला अकादमीचे सल्लागार व संस्कारभारतीचे सदस्य होते. चिपळूण येथे झालेल्या ७६व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे त्यांनी अध्यक्षपद भूषविले होते (१९९५). त्यांना अनेक मानसन्मान लाभले. यामध्ये होमी भाभा पुरस्कार (१९६९), नाट्यदर्पण पुरस्कार (१९७८), पद्मश्री सन्मान (१९८८), संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९८९), महाराष्ट्र गौरव पुरस्कार (१९९०), गोमंतक मराठी अकादमी पुरस्कार (१९९२), सूरश्री केसरबाई केरकर पुरस्कार (१९९६), मास्टर दीनानाथ स्मृती पुरस्कार (१९९६), स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार (१९९६), बालगंधर्व पुरस्कार (नाट्य परिषद, १९९७) इत्यादींचा समावेश होतो. पुणे येथे ७ नोव्हेंबर १९९८ रोजी अल्पशा आजाराने त्यांचे निधन झाले.

**-सु.र. देशपांडे**
(मराठी विश्वकोष)

# माणगाव, गोरेगावमधील संघकार्य



रायगड जिल्ह्याच्या गोरेगाव माणगाव परिसरात साधारणतः १९४० च्या सुमाराला म्हणजे जेव्हा रायगड जिल्ह्यात संघाचे काम सुरू झाले तेव्हापासूनच इथे कार्य सुरू झाले.

प्रमुख कार्यकर्त्यांमध्ये डॉ. दामोदर अधिकारी, आर. पी. जोशी, मधुकर उर्फ काका कामत, राजाभाऊ मोने ही नावं मुख्यतः घ्यावी लागतील. नंतरच्या काळात नारायणराव दळवी, विश्वासराव वर्तक, डॉ. श्रीरंग साठे, बापूराव जोशी ई. कार्यकर्त्यांनी कार्याची धुरा सांभाळली. तीन प्रसंग असे सांगता येतील की ज्या प्रसंगांमुळे गोरेगाव माणगाव भागातील कामाला चालना मिळाली.

१९७५ ते ७७ हा आणीबाणीचा काळ. हा जणू काही संघाच्या परीक्षेचा काळ होता. आणीबाणीच्या काळात भूमिगत राहून काम करावे लागत असे. त्या काळामध्ये गुप्तपणे पत्रकं ठीक ठिकाणी पोहोचवणं हे एक मोठं जिकरीचं काम होतं. गोरेगाव मध्ये गुप्तपणे पत्रक पाठवण्याची एक व्यवस्था केली गेली होती. एका ठराविक वर्णनाची व्यक्ती लोणेऱ्याला एका ठराविक ठिकाणी येऊन पत्रकांची पिशवी घेऊन उभी राहात असे. आम्हाला त्यावेळेला त्या व्यक्तीचं वर्णन करून सांगितले जात असे व ते कुठे उभे राहणार हेही सांगितलं जात असे. मग आम्ही लोणेऱ्याला जाऊन तिथे उभ्या असलेल्या आम्हाला सांगितलेल्या वर्णनाच्या व्यक्तीजवळ जायचं आणि फक्त त्याच्या हातातल्या पिशवीला हात लावायचा. हा संकेत होता आणि त्या संकेताप्रमाणे मग आमच्या हातात पत्रक दिली जायची. ही पत्रकं मग निमुटपणे आम्ही गोरेगावला घेऊन यायचो. डॉ. अधिकारींच्या अंगणामध्ये एक खड्डा खणला होता त्या खड्ड्यावर एक पत्रा ठेवून पत्र्यावर विटा रचलेल्या असायच्या. त्या खड्ड्यामध्ये पत्रक लपवून ठेवली जायची आणि मग ते गुप्तपणे गोरेगाव आणि आसपासच्या परिसरामध्ये वाटली जायची. माणगाव गोरेगावमध्ये सत्याग्रह करायचा असं ठरलं आणि त्यासाठी कॉलेज विद्यार्थ्यांची एक टीम ही देखील तयार केली गेली. प्रत्येक भागाला सत्याग्रहाची तारीख दिली गेली होती. नेमकी गोरेगावची जेव्हा तारीख होती त्यावेळेला त्या विद्यार्थ्यांची परीक्षा लागल्यामुळे विद्यार्थी सत्याग्रहाला येऊ शकले नाहीत. पण तरीदेखील नारायणराव दळवी यांनी निर्धार केला की मी सत्याग्रह करणार. त्यांनी आणि प्रल्हाद भाटे यांनी त्या वेळेला माणगाव मध्ये सत्याग्रह केला. त्या सत्याग्रहाला पूरक म्हणून महाड ते मुंबई जाणाऱ्या बस मध्ये काही स्वयंसेवकांना बसवून त्यांच्या हातात पत्रक दिली होती आणि माणगावमध्ये बस शिरल्याबरोबर त्यांनी बस मधून पत्रक टाकायची त्यांनी पत्रक टाकायला सुरुवात केलं की टम बॉम्ब चे फटाके फोडायचे आणि लोकांचं लक्ष वेधून घ्यायचं. त्याच वेळेला वर उल्लेखलेल्या दोघांनी घोषणा द्यायच्या छोटी भाषणं करायची. दोघेजण घोषणा देत माणगावभर फिरत होते. भाषणं देत होते. पोलीस आले, पण त्यांना अटक करेनात करण अटक करण्याची सूचना त्यांना आली नव्हती. घोषणा देऊन घसा कोरडा झाला तरी अटक झाली नाही. शेवटी हे दोघे कार्यकर्ते अण्णा शेलार यांच्या चहाच्या दुकानात शिरले आणि दोन कप चालू चहा मागून प्यायले आणि पुन्हा सत्याग्रहाला सुरुवात केली. त्यानंतर काही वेळाने त्यांना अटक करण्याचे आदेश आले व अटक केली गेली. फारशी काही शिक्षा झाली नाही. नायब तहसीलदार धारप यांच्या आदेशाने त्यांना सोडले गेले. आणीबाणी विरोधी कार्यामध्ये संघाचा सहभाग पाहून अनेक नवीन लोकं आणीबाणी उठल्यावर संघाच्या कामात जोडले गेले.

यानंतरचा मोठा कार्यक्रम म्हणजे पुणे येथील तळजाईच्या पठारावर महाराष्ट्र प्रांताचे प्रांतिक शिबिर. १९८३ च्या संक्रांतीला हे शिबिर झाले होते. गोरेगाव हून देखील चांगल्या संख्येने गणवेशधारी स्वयंसेवक गेले होते. तसंच काही अन्य लोकांना शिबिर पाहायला निमंत्रित केलं होतं. गोरेगाव मधले व्यापारी देखील गाड्या काढून शिबिर बघायला आले होते. गोरेगाव मधले काँग्रेसचे एक महत्त्वाचे कार्यकर्ते श्री जोशी वकील हेही शिबिर पाहायला आले होते. ३५ हजार स्वयंसेवक, पण कुठेही गोंधळ नाही गडबड नाही. सगळेजण शिस्तीत होते. एका सिटीसरशी सगळेजण उभे राहतात किंवा बसतात हे दृश्य पाहून ते भारावून गेले. त्यानंतर वाचनालयात झालेल्या एका जाहीर सभेमध्ये त्यांनी संघाचे कौतुक केले. शिबिराची तुलना त्यांनी काँग्रेसच्या अधिवेशनाच्या बेशिस्तीशी केली. काँग्रेसचे एक अधिवेशन मुंबईच्या रेस कोर्स वर झाले होते. पावाची गाडी आली असं समजताच सगळे कसे धावून आपल्याला आधी कसा पाव मिळेल यासाठी धडपडत होते. अशी तुलना त्यांनी केली व संघाचे कौतुक केले. शिबिरानंतर गोरेगाव मध्ये रात्र शाखा सुरू झाली व तरुण त्या शाखेत यायचे. नारायणराव दळवी यांनी त्या वेळेला गोरेगाव मध्ये व्यवसाय म्हणून एक छोटेसे हॉटेल सुरू केले. त्याच वेळेला गोरेगाव मध्ये अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू झाले होते. या महाविद्यालयातले विद्यार्थी हॉटेलमध्ये चहा नाश्त्यासाठी येत असत. हे हॉटेलच जणू त्या विद्यार्थ्यांचं उठण्या बसण्याचं ठिकाण झालं. त्या संपर्कातून मग कॉलेज विद्यार्थ्यांचीदेखील एक शाखा गोरेगाव मध्ये सुरू झाली.

१९८७-८८च्या सुमाराला राम जन्मभूमी आंदोलनाच्या निमित्ताने एक रथयात्रा निघाली होती. या रथयात्रेचा मार्ग माणगाव गोरेगाव म्हसळा असा होता. या मार्गात असलेल्या मोरबा या ठिकाणी मुस्लिम धर्मीयांनी यात्रेवर दगडफेक केली, हल्ला केला आणि दंगा झाला. पण यात्रा थांबली नाही. उलट हिंदू यामुळे अधिकच पेटून उठले. जागे झाले आणि परिणामी या यात्रेनिमित्त गोरेगावला झालेल्या जाहीर कार्यक्रमाला अभूतपूर्व उपस्थिती राहिली. काठी वरती भगवा झेंडा लावून तरुण आले आणि त्यांना हे माहिती होतं वरती जरी झेंडा लावला असला तरी त्या झेंड्याच्या खाली असलेली काठी आपल्या हातात आहे. आणि वेळप्रसंगी त्या काठीचा उपयोग करता आला पाहिजे अशी भावना त्या वेळेला त्या तरुणांच्यात होती. ही झालेली हिंदू जागृती देखील पुढे बराच काळ टिकून राहिली आणि त्याही मुळे कामाला गती मिळाली.

असे हे वेगवेगळे तीन प्रसंग की ज्यामुळे कामाला गती मिळाली. नंतरच्या काळामध्ये संघ शिक्षा वर्गाला जाणाऱ्यांची संख्या देखील वाढली आणि काही नवीन कार्यकर्ते देखील लाभले. सॉफ्टवेअर इंजिनियर असलेले अनुप केळकर, जे अमेरिकेहून परत आले होते ते प्रचारक म्हणून आले. त्यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आकृष्ट केलं. या विद्यार्थ्यांना संघाच्या कामात सहभागी करून घेतलं.

गोरेगावला झालेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रवासामध्ये प्रामुख्याने उल्लेख करता येईल तो त्यावेळेसचे सरसंघचालक पूजनीय गोळवलकर गुरुजी. परम पूजनीय गुरुजींच्या प्रवासात त्यांनी माणगाव तालुक्यातील विष्णू बुवा ब्रह्मचारींच्या कार्याचा उल्लेख केला होता. हे सूत्र पकडून नंतरच्या काळात माननीय मोरोपंत पिंगळे यांनी विष्णूबुवा ब्रह्मचारींच्या कार्याची माहिती गोळा करायला सुरुवात केली. माणगाव गोरेगाव मधल्या काही कार्यकर्त्यांना सोबत घेऊन विष्णू बुवा ब्रह्मचारींनी त्यांच्या शिकवली या गावी स्थापन केलेल्या दत्ताच्या पादुका ई. चा शोध घेतला. सध्या संघाचे स्वयंसेवक श्री सुरेश गीखले विष्णुबुवांच्या नावाने महत्वपूर्ण काम करताहेत.

माननीय सुदर्शनजींचा प्रवास हा १९८५ मधे झाला. त्यावेळेला ते संघाचे अखिल भारतीय बौद्धिक प्रमुख होते. संघाच्या योजनेप्रमाणे दरवर्षी सर्व प्रांतामधील प्रत्येक जिल्ह्यापर्यंत एका केंद्रीय अधिकाऱ्याचा प्रवास होत असे. त्यावर्षी या योजने अंतर्गत माननीय सुदर्शनजींचा प्रवास रायगड जिल्ह्यात झाला होता. जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक आणि संध्याकाळी संचलन व जाहीर सभा असा कार्यक्रम होता. माणगाव गोरेगावचे संघकाम, त्यामध्ये आलेले चढ-उतार याची ही थोडक्यात माहिती.

**-नारायणराव दळवी, विश्वासराव वर्तक**

**येत्या शनिवारी, २७ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला १०० वर्षे पूर्ण होत आहेत.**

# अभूतपूर्व प्रतिसाद

मी शिवराज वसंतराव भागवत महाड सध्या माझ्याकडे संघाचे जिल्हा संघचालक म्हणून दायित्व आहे. याआधी १९८५ ते २००५ या काळात माझ्याकडे जिल्हा स्तरावरच्या विविध जबाबदाऱ्या पार पाडता आल्या २००५ मध्ये जनकल्याण रक्तपेढीचे काम माझ्याकडे आले. ते आज पर्यंत सुरू आहे . जिल्हा संघचालक पदाची जबाबदारी २०२४ मध्ये माझ्याकडे आली आहे. १९८४ मध्ये रायगड आणि कुलाबा असे स्वतंत्र दोन जिल्हे झाल्यानंतर रायगड जिल्हा कार्यकारी मंडळात शारीरिक शिक्षण प्रमुख म्हणून दायित्व आले. जिल्ह्यामध्ये महाड, श्रीवर्धन गोरेगाव, रोहे, पाली, म्हसळे, मुरुड इत्यादी ठिकाणी हिवाळी शिबिरे झाली.

वडील संघ स्वयंसेवक असल्यामुळे लहानपणापासूनच घरामध्ये संघाचे वातावरण आहे. रायगड जिल्ह्यामध्ये संघाचे काम खूप जुने आहे.१९८३मधे तळजाई शिबिरात सहभागी होता आले. अतिशय विराट दृश्य जवळून अनुभवता आले. त्यानंतर देशपातळीवर निघालेल्या भारत माता आणि गंगाजल या यात्रेमध्ये महाड हे एक मुक्कामाचे ठिकाण होते. माझ्याकडे त्यावेळेस रक्षक प्रमुख म्हणून जबाबदारी होती. अभूतपूर्व प्रतिसाद म्हणजे महाडच्या जत्रे सारखेच स्वरूप त्याला प्राप्त झाले होते.

संघ कामाच्या बाबतीत म्हणायचे झाले तर रायगड जिल्हा हा औद्योगिक वसाहतींचा जिल्हा असल्या मुळे अन्य जिल्ह्यातून येणाऱ्या स्वयंसेवकांची संख्या मोठी आहे. त्यांना काही प्रमाणात स्थानिक कामात सहभागी करून घेता आले. जिल्ह्यामध्ये वर्ग शिबिर दिवाळी वर्ग संघ शिक्षा वर्ग असे कार्यकर्ता निर्मितीचे काम सहभागी होऊन करता आले. संघाचे काम जुने असले तरी शाखांच्या परिमाणात मोजायचं झाले तर ते कमी होते.

महाड मधील जिल्ह्यातील रोहे येथे आलेले महापूर आणि त्यानंतर १९८९ मध्ये झालेली जांभूळपाड्याची वाताहात. महाड रोहे नागोठणे व जांभूळपाडा येथे पूर परिस्थिती नंतरची कामे स्वयंसेवकांच्या मदतीने केली. चिखल उपसणे भिजलेले धान्य गाडीत भरून देणे यासाठी मोठी संख्या मुंबई मधून देखील कार्यकर्ते आले होते. जिल्ह्याचे दायित्व असल्याकारणाने माझ्या घरी अनेक प्रांत कार्यकर्ते, केंद्रीय कार्यकर्ते ,विभागाचे कार्यकर्ते मुक्कामाला असत त्यामुळे त्यांचे मार्गदर्शनही लाभले. पुजनीय डॉ.हेडगेवार जन्मशताब्दी वर्षांमध्ये रायगड जिल्ह्यामध्ये निधी संकलन हे खूप मोठ्या प्रमाणात करायचे ठरवले होते व ते झालेही. सेवा प्रकल्पांची निर्मिती करणे यासाठी हे प्रयोजन होते.

अन्य प्रांतातून रायगड किल्ला बघण्यासाठी येणारे प्रांत व केंद्र कार्यकर्ते यांच्याबरोबर रायगड किल्ला दाखवण्यासाठी दहा ते पंधरा वेळा गेलो आहे. पुढे विश्व हिंदू परिषदेच्या आयोजनातून श्रीराम ज्योत यात्रा व श्रीराम शीला पूजन असे दोन मोठे कार्यक्रम रायगड जिल्ह्यामध्ये अभूतपूर्व प्रतिसादामध्ये संपन्न झाले. अयोध्यातील मंदिरासाठी कारसेवकांची मोठी संख्या गेली होती. १९९२ मध्ये बाबरी मशिदीचे पतन याचे निमित्त करून संघावर बंदी घातली होती त्यावेळेस दोन दिवस पोलीस स्टेशनमध्ये मुक्काम होता.

कै.मा.मोरोपंत पिंगळे यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचे सत्काराचा कार्यक्रम जिल्ह्यामध्ये नागोठणे येथे झाला जिल्ह्यातून सुमारे पाचशेच्या वर स्वयंसेवक सहकुटुंब सहभागी झाले होते. १९९१ व १९९२ हे वर्ष जिल्ह्यामध्ये अनेक तालुक्यात स्वयंसेवकांनी पतपेढ्या निर्माण केल्या. संघविचार समाजाभिमुख असतात हे या संस्था मधून समाजापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न झाला. अनेक प्रकारच्या आंदोलनामुळे विश्व हिंदू परिषद भारतीय मजदूर संघ व भारतीय जनता पार्टी यांचे काम जिल्ह्यात सर्वत्र सुरू झाले असे म्हणता येईल.!

कै.काकासाहेब चितळे स्मृती केंद्राच्या वतीने समाजाची रक्ताची गरज लक्षात घेऊन जनकल्याण रक्तपेढी या सेवा प्रकल्पाचे काम सुरू झाले. रक्तदान चळवळ जिल्ह्यात रुजवण्याचे काम करता आले. सध्या रक्तपेढीचे सचिव आहे.

२००५ मध्ये कै.काकासाहेब चितळे स्मृती केंद्र महाड या स्वयंसेवकांनी चालवलेल्या संस्थेत विश्वस्त म्हणून काम करायची संधी मिळाली आहे.ती आज पर्यंत पार पाडत आहे.

**-शिवराज वसंतराव भागवत**

# सीकेटी विद्यालयात संस्कृत दिन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दरवर्षीप्रमाणे या वर्षी ही संस्कृत दिन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यमिक विद्यालयात साजरा करण्यात आला. संस्कृत हा विषय गेले कित्येक वर्ष इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यासाठी शिकवला जातो. या विषयाबद्दल तसेच आपल्या परंपरेचा सन्मान वाढवा व संस्कृत भाषेचे संवर्धन, संरक्षण या हेतूने विद्यालयात हा दिवस साजरा केला जातो.

या संपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी ८ वी ते १० तील संस्कृत विषयाच्या विद्यार्थ्यांनी पार पाडली . कार्यक्रमाची सुरुवात संगीत शिक्षक रुपेश मढवी सर आणि विद्यार्थी वृंद यांच्या ईशस्तवन आणि स्वागत गीताने करण्यात आली. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नृत्य, कथा कथन, भगवत गीता श्लोक पठण, भगवत गीतेची रचना व वैशिष्ट्ये आणि भगवद्गीता संमत शिक्षण प्रणाली यावर आधारित भाषणे तसेच ताणतणाव व्यवस्थापनात भगवद्गीतेचे योगदान या विषयावर एक लघु नाटिका इत्यादींचे सादरीकरण करण्यात आले.

ओम वाघ आणि श्रुती पवार या १०वीच्या विद्यार्थ्यांनी पूर्णतः संस्कृत मधून या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. संस्कृत विषयक विविध परीक्षा मधील प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना यावेळी पारितोषिक व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक चव्हाण सर, सीकेटी इंग्रजी प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षिका नीरजा अदुरी, इंग्रजी पूर्व प्राथमिकच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी, शिक्षक पालक संघाचे सदस्य प्रिया काशिद व अर्चना शिंदे हे उपस्थित होते.

या कार्यक्रमात इयत्ता सातवीचे विद्यार्थी व वर्गशिक्षक सहभागी झाले. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. आभार प्रदर्शन व प्रास्ताविक संस्कृत शिक्षिका शाल्वी ठाकूर यांनी केले.

# ‘दिबां’चे कार्य शालेय भिंतींवर; परेश ठाकूर यांच्याकडून आढावा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रकल्पग्रस्तांचे झुंझार लोकनेते स्व. दि.बा. पाटील यांच्या कार्याची माहिती शालेय विद्यार्थ्यांना व्हावी, यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या लोकनेते दि.बा.पाटील विद्यालयात त्यांच्या प्रतिमेसह त्यांच्या जीवन प्रवासातील महत्त्वपूर्ण घटना आणि कार्याची माहिती विद्यालयाच्या भिंतींवर आकर्षकपणे रेखाटण्यात आली आहे.

पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शनिवारी (दि.२०) या उपक्रमाची पाहणी करून आढावा घेतला तसेच आवश्यक त्या सूचना केल्या.

या वेळी त्यांच्यासोबत भाजपचे पनवेल मंडळ अध्यक्ष सुमित झुंजारराव, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, प्रभाग १९ अध्यक्ष पवन सोनी, प्रशांत शेट्ये, रूपेश नागवेकर, शहर अभियंता संजय काटेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# ग्रामीण विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**नवी मुंबई : बातमीदार**

ग्रामीण, आदिवासी भागातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत पुरवण्यासाठी कौतिके चॅरिटेबल फाउंडेशनतर्फे एक प्रेरणादायी उपक्रम हाती घेण्यात आला.

जिल्हा परिषद शाळा, महोदर (ता. पनवेल, जि. रायगड) येथे आयोजित कार्यक्रमात शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला आहे.

या कार्यक्रमावेळी फाउंडेशनचे सदस्य विजय जाधव, सतीश जाधव, संतोष जाधव, जयश्री सुतार, निलेश कुटे, अभिषेक सिंग, अभिनय सिंग, ज्ञानेश्वर जाधव, सुमन यादव, प्रवीण गोळे, ज्ञानेश्वर सकपाळ, आकाश मिश्रा व अन्य सहकारी उपस्थित होते.



**उरण : नवरात्रोत्सव येत्या सोमवारपासून सुरू होणार आहे. त्या निमित्ताने देवीचे मुखवटे बाजारात दाखल झाले आहेत. ६० रुपयांपासून ६०० रुपयांपर्यंत दराने ते विकले जात आहेत. लहान, मोठे सर्व प्रकारचे आकर्षक, सुंदर मुखवटे विकावयास आले आहेत.**

# भाजपचे अमर ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

निमित्त वाढदिवसाचे, ध्येय फक्त समाजाच्या सेवेचे या ब्रीदवाक्याप्रमाणे युवा नेते अमर ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवारी (दि.२०) कळंबोलीमध्ये लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत वार्षिक शालेय शुल्काची जबाबदारी व नवदुर्गा नारी सन्मान अशा विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.



कळंबोलीतील सेक्टर १ ई, येथील नवीन सुधागड शाळेतील गरीब विद्यार्थ्यांच्या वार्षिक शालेय शुल्काची जबाबदारी युवा नेते अमर ठाकूर यांनी घेतली या अनुषंगाने आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, बीजेपी कळंबोली शहर अध्यक्ष अमर पाटील, रविनाथ पाटील, संदीप म्हात्रे तसेच भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी माझी नगरसेवक यांच्या उपस्थितीत नवीन सुधागड शाळेच्या मुख्याध्यापकांना एक लाखाचा धनादेश सुपूर्द केला.

या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते समाजात महिला सबलीकरणाचा संदेश देणाऱ्या सुमारे ६० अधिक महिलांना ’नवदुर्गा नारी सन्मान’ हा विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला.यामध्ये परिचारिका, विविध शाळांमधील शिक्षका, सामाजिक कार्यकर्त्या, सफाई कर्मचारी महिला अशा विविध क्षेत्रातील महिलांचा समावेश होता.

या उपक्रमासाठी माऊली फाऊंडेशनचे सदस्य तसेच भारतीय जनता पक्षाचे कळंबोलीमधील कार्यकर्ते, सुधागड शाळेतील शिक्षक वर्ग विद्यार्थी, स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या पालकांशी संवाद

**खारघर : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.२०) पालक - शिक्षक समितीतर्फे प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी पालक-शिक्षक सभेचे आयोजन केले होते.

प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी उपस्थित पालकांशी संवाद साधून महाविद्यालयीन सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धा त्यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले व सर्व पालकांच्या शंकांचे निरसन केले. या पालक शिक्षक सभेचे आयोजन प्रा. नीलम मोरे, प्रा. तनुजा सुमन यांनी केले तसेच, प्रा. डॉ. नीलम लोहकरे, प्रा. डॉ. रीत ठुले प्रा. विशाल देशमुख, प्रा. राजश्री म्हात्रे, प्रा. रिजवाना मोमीन, प्रा. डॉ. प्रवर शर्मा हे सर्व विभाग प्रमुख तसेच पालक-शिक्षक समितीतील इतर सर्व सदस्यांनी तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# समुद्र जपूया, निसर्ग वाचवूया!

## मुरूडमध्ये आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिन साजरा

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड येथील वसंतराव नाईक कला आणि वाणिज्य महाविद्यालयामधील राष्ट्रीय सेवा योजना युनिट १० आणि जीवन दीर्घ शिक्षण आणि विस्तार विभाग, राष्ट्रीय किनारा संशोधन केंद्र व मुरूड-जंजिरा नगरपालिका परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिन साजरा करण्यात आला. या वेळी राबविण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेत नागरिकांनी व शालेय विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शेकडो हातांनी समुद्रकिनारा स्वच्छ केला.



या मोहिमेवेळी तहसीलदार आदेश डफळ, पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, डॉ. सुभाष म्हात्रे, वसंतराव नाईक महाविद्यालयात विकास समिती सदस्य डॉ. विश्वास चव्हाण, प्राचार्य डॉ. जनार्दन कांबळे, एनएसएस प्रमुख डॉ. श्रीशैल बहिरगुडे, गजानन मुनेश्वर, महाराष्ट्र मच्छीमार कृती समिती उपाध्यक्ष तथा रायगड जिल्हा मच्छीमार सहकारी सोसायटीचे उपाध्यक्ष मनोहर बैले, नगर परिषदेचे प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आंबेतकर, बंदर निरीक्षक प्रमोद राऊळ, डॉ. नारायण बागुल, डॉ .सीमा नाहिद, राकेश पाटील, सतेज निमकर, सिटी को-ऑडिनेटर सचिन कोरके, सागर कन्या मच्छीमार सहकारी सोसायटीचे व्हाइस चेअरमन मनोहर मकु, विजय सुर्वे यांच्यासह विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

यावेळी डॉ.सुभाष म्हात्रे यांनी शपथीचे वाचन करून विद्यार्थी व मान्यवरांनी स्वच्छतेची शपथ दिली. प्राचार्य डॉ.जनार्दन कांबळे यांनी, स्वच्छता ही राष्ट्र सेवा आहे. आपला परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केले पाहिजे, असे मत व्यक्त केले.

डॉ. विश्वास चव्हाण म्हणाले की, सागरी स्वच्छता महाविद्यालयाच्या माध्यमातून दरवेळी किनारा स्वच्छ केला जातो. आताच्या विद्यार्थ्यांना चांगले संस्कार असल्याने कचरा कुठेही दिसला की तो डस्बीनमध्ये टाकला जातो. त्यामुळे मुरूड स्वच्छ, सुंदर असून किनाराही स्वच्छ राहील याची काळजी घेतली पाहिजे.

मनोहर बैले यांनी म्हटले की, समुद्र हा केवळ पाण्याचा अथांग साठा नाही, तर तो आपला जीवनदाता आहे. सागरी स्वच्छता दिनानिमित्त सहभागी होताना निसर्गाशी असलेले नाते अधिक दृढ झाल्याची जाणीव झाली.

कचरा उघड्यावर व गटारात न टाकता नगर परिषदेच्या कचरा गाडीमध्ये टाकावा. हे प्रत्येकानी केले तर कुठलीच रोगराई पसरणार नाही, असे डॉ. श्रीशैल बहिरगुडे यांनी सांगितले.

या स्वच्छता मोहिमेत दोन टनपेक्षा कचरा गोळा करण्यात आला. या वेळी नगरप रिषदेच्या वतीने साफसफाई करणाऱ्यांना तोंडाला मास्क व हॅन्डगोल्ज देण्यात आले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.सुभाष म्हात्रे यांनी केले, तर आभार डॉ.नारायण बागुल यांनी मानले.

# आदिवासींपर्यंत शासकीय योजना पोहचवा -जिल्हाधिकारी

**चौक : प्रतिनिधी**

आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासाचे पर्व सुरू झाले असून त्यासाठी १७ विभागांच्या २५ योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहचवण्याचे कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आदी कर्मयोगी योजनेचा शुभारंभ जिल्हाधिकारी जावळे यांच्या हस्ते खालापूर तालुक्यातील कलोते ग्रुप ग्रामपंचायत येथे करण्यात आला. या वेळी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान व सेवा पंधरवडा कार्यक्रमाचादेखील शुभारंभ झाला. त्या वेळी ते बोलत होते.



या कार्यक्रमास आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे, तहसीलदार अभय, निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.मोरे, विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल, विनोद चांदोरकर, महसूल मंडळ अधिकारी माणिक सानप, प्रशासक अमित म्हसकर, ग्रामपंचायत अधिकारी निलेश म्हसकर, महिला व बालविकास अधिकारी अंधोरीकर यांच्यासह कर्मचारी, ग्रामस्थ व महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

जिल्हाधिकारी पुढे म्हणाले की, अपना गाव समृद्धी का सपना या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आदिवासी गावाचा सर्वांगीण विकास करणे आहे. यासाठी निवडलेल्या गावामध्ये व्हिलेज ॲक्शन प्लॅन तयार करण्यात येणार आहे. गावकऱ्यांनी एकत्र येऊन गावच्या गरजा ओळखून विकास आराखडा तयार करावा व त्यासाठी गावातील बुद्धिजीवी व सक्षम माणसाची निवड करावी.

शासनाच्या सर्व योजनांचा लाभ आदिवासीपर्यत पोहचवणे हे या कार्यक्रमाचे मूळ उद्दिष्ट आहे. महिला महिला व बाल कल्याण, ग्रामीण विकास, कृषी, आरोग्य, शिक्षण यांसारख्या १७ विभागाच्या २५ योजनांचा त्यात समावेश करण्यात आल्याचे प्रास्ताविकात आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे यांनी सांगितले.

# वरसे येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील वरसे ग्रुप ग्रामपंचायतीच्या वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत नुकतीच गावस्तरीय कार्यशाळा व ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती.



या वेळी सरपंच रामाशेठ म्हात्रे, ग्रामसेवक विजय अहिरे, सदस्य मनोहर सुर्वे, अमित मोहिते, उतेश कांबळे, शांतीशील तांबे, मृणाली शिवलकर, अपर्णा पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष तुकाराम पाटील, अनिल बामुगडे, गणेश शिवलकर, दीपक चिपळूणकर, गुणाजी पोटफोडे, अतेश पडवळ, मिलिंद रटाटे, समीर देवरे, दीपक पाटील, प्रशांत राऊत, दिलीप देशमुख आदी उपस्थित होते.

या वेळी ग्रामसेवक विजय अहिरे यांनी प्रस्तावना करीत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची माहिती दिली. तलाठी राजपुत यांनी पाणंद रस्ते तयार करणे या संदर्भात माहिती दिली.

खाडे यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात सर्वांना सोबत घेऊन चला अशी संकल्पना राबवत गावाच्या विकासासाठी सात घटक आहेत, असे सांगितले. या अभियानात यशस्वी ग्रामपंचायतींना तालुका ते राज्यस्तरीय पुरस्कार असल्याचे सांगून त्यांनी अभियानाची सविस्तर माहिती दिली.

या ग्रामसभेत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना अंतर्गत सात घटकांची समिती तयार करण्यात आली. या वेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ, अंगणवाडी कर्मचारी, महिला बचत गटाचे पदाधिकारी व महिला मंडळ उपस्थित होते.

# पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त स्वच्छता अभियान

◆ नागोठण्यात भाजपचा उपक्रम

**नागोठणे : बातमीदार**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त नागोठण्यातील भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून स्वच्छता अभियान मोहीम राबविण्यात आली. त्यांनी रामनगर साई मंदिर परिसर स्वच्छ करून आपल्या लाडक्या पंतप्रधानांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

या मोहिमेत रोहा तालुका चिटणीस आनंद लाड, महिला मोर्चा तालुका अध्यक्ष अपर्णा सुटे, तालुका क्रीडा संयोजक शेखर गोळे, अंकुश सुटे, प्रमोद गोळे, गणेश घाग, ज्ञानेश्वर शिर्के, धनराज उमाळे, तिरतराव पोलसानी, आदित्य सुटे, हेमंत लाड, अरुण गजबे, नवल तायडे, संजय पानकर आदींनी सहभाग घेतला.



# टेमपालेमध्ये रक्तदान शिबिरास प्रतिसाद; महिलांचेही योगदान

**माणगाव : प्रतिनिधी**

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून आपल्या रक्ताच्या एका थेंबाने एखाद्याचा जीव वाचू शकतो ही समाजसेवी भावना नजरेसमोर ठेवून माणगाव टेमपाले येथील जामा मशीद या ठिकाणी जमातुल मुस्लिमीन यांच्या वतीने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. अलिबाग शासकीय रुग्णालय रक्तपेढीच्या सहकार्याने झालेल्या या रक्तदान शिबिरास चांगला प्रतिसाद लाभला.

या वेळी ५१ रक्तबॅगा संकलित करण्यात आल्या. मुस्लिम महिलांनीही या शिबिरात सहभाग घेऊन रक्तदान केले. शिबिराला लोणेरे येथील डॉ. अनिल मेथा यांच्यासह इतर मान्यवरांनी भेट देऊन आयोजकांचे कौतुक केले.

शिबिर यशस्वी करण्यासाठी जिल्हा शासकीय रुग्णालय रक्तपेढीचे डॉ. दीपक गोसावी, सुनील बंदीछोडे, वैभव कांबळे, गणेश भोये, मनोहर हडस, मंगेश पिंगला, महेश घाडगे, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोही वाडेकर, आशा वर्कर प्रेमा साळवी, जमातुल मुस्लिमीनतर्फे टेमपाले मोहल्ला अध्यक्ष अब्दुल अजीज गजगे, मजिद लोखंडे, मुफ्ती मुजफ्फर सेन, पोलीस पाटील समीर मुरुडकर, जब्बार साखरकर, गुलाम अलसुलकर, साजिद खानदेशी, अब्दुल्ला मुकादम, जहीर अलसुलकर, महिला अंजुमन कमिटी अध्यक्ष सऊदा सेन यांच्यासह ग्रामस्थ, महिला यांनी परिश्रम घेतले.





# पहाटे गारवा, दुपारी ऊन आणि सायंकाळी पाऊस

## बदलत्या वातावरणाने नागरिक हैराण



**खोपोली : प्रतिनिधी**

वातावरण सातत्याने बदल घडत आहेत. पहाटे धुके पडते. दुपारी रणरणते ऊन असते, तर सायंकाळी आकाशात ढग दाटून येतात. त्यामुळे मानवी आरोग्यावर विपरित परिणाम होत आहेत.

सकाळी जरी वातावरणात धुके पडत असले तरी थंडी जाणवत नाही, मात्र धुक्यामुळे वाट काढणे वाहनचालकांना अवघड जात आहे. दुपारी सूर्यदेवाचे उग्र रूप अंगातून अक्षरश: घामाच्या धारा काढतो, तर सायंकाळी आकाशात काळे ढग दाटून येत पाऊस पडतो. या पावसामुळे शेतात तयार होत असलेले धान्य नुकसान होण्याच्या मार्गावर असून शेतकरी धास्तावले आहेत.

# रिपाइंच्या ६८व्या वर्धापन दिनाची तयारी

**पाली : प्रतिनिधी**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाचा ६८वा वर्धापन दिन ३ ऑक्टोबर रोजी क्रांतिभूमी महाडमध्ये साजरा होणार आहे. वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर मुरूड तालुक्यातील उसरोली टेप येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आढावा बैठक झाली.

या बैठकीस कोकण प्रांत सचिव जयप्रकाश पवार, पनवेल महापालिका प्रमुख प्रभारी मोहनिष गायकवाड, अलिबाग मुरूड विधानसभा अध्यक्ष सुनील सप्रे, मुरूड तालुका अध्यक्ष बबन शिंदे, कर्जत तालुका अध्यक्ष हिरामण गायकवाड, अशोक गोतारने, संजय जाधव, रघुनाथ कांबळे, वसंत मोरे, नितिन गायकवाड, नरेंद्र कोंजीरकर, विजय मोरे, नरेंद्र जादव, विजय खैरे, आनंद जादव, काशिनाथ शिंदे, कमलेश कांबळे, मनोज पबरेकर, राम शिंदे, विजया तांबे, माधुरी शिंदे, संजना तांबे, पार्वती शिंदे, शोभा शिंदे, प्रिया उमटेकर, नरेश आरगावकर, अशोक यादव आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील वाटचाल करण्याचे बैठकीत ठरले. या वेळी रिपाइंचे नवनिर्वाचित जिल्हा संपर्क प्रमुख राहुल सोनावळे यांचा सत्कार करण्यात आला.



# चेरफळवाडीत ‘संस्कृती संगम’ उत्साहात

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील चेरफळवाडी गावात प्राईड इंडिया आणि रोटरी क्लब ऑफ बॉम्बे पिअर यांच्या शाश्वत ग्राम प्रकल्प अंतर्गत संस्कृती संगम हा कार्यक्रम उत्साहात झाला.

ग्रामीण भागातील संस्कृतीचे जतन व्हावे व गावातील महिला, मुले, युवक व युवती यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि सांस्कृतिक वैभव जतन करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. संस्थेच्या शाश्वत ग्राम प्रकल्पातील नंबरवाडी, उंबरवाडी व चेरफळवाडी गावातील नागरिकांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेऊन आपल्या कला सादर केला.



ढोलकी व घुंगराच्या तलवार पारंपरिक नृत्य पेश करून उपस्थितांचे मनोरंजन करण्यात आले. यामध्ये गावातील सर्व लहान थोर मंडळींनी फेर धरला. यामधून सांस्कृतिक, पारंपरिक विविध कला पहावयास मिळाल्या तसेच गावातील मंडळी एकत्र आल्यामुळे विचारांचे आदानप्रदान झाले व प्रकल्पाच्या उपक्रमाची माहिती मिळाली.

संस्थेच्या मानद संचालिका ईशादिदी मेहरा, कोकण विभागीय व्यवस्थापक डॉ. वीरेंद्र कुलकर्णी, वरिष्ठ कार्यक्रम व्यवस्थापक वसंत मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे प्रकल्प समन्वयक श्री. धामणस्कर यांच्या नियोजनानुसार संस्थेचे कार्यकर्ते स्नेहा खामकर, वेदश्री पाचपांडे, सुभाष धानिवले, शाळेचे शिक्षक राजेश काळे, श्री. इंदुलकर, श्री. बांगारे, ग्रामस्थ रूपेश हंबीर, जानू हंबीर, दामा निरगुडे, रवींद्र हंबीर, दीपिका पिंगळा, पार्वती वारगुडे, ललिता वारगुडे, लक्ष्मी वारगुडे, नामदेव वारगुडे, लिंबाजी हंबीर, दिनेश वारगुडे, सुरेश हंबीर, चंद्रकांत वारगुडे यांनी यशस्वी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवक प्रतिनिधी दीपक पारधी यांनी केले.

# नाईक महाविद्यालयात हिंदी दिन साजरा

**मुरूड : प्रतिनिधी**

कोकण उन्नती मित्र मंडळाच्या मुरूडमधील वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालयात जंजिरा येथील हिंदी विभागाच्या वतीने हिंदी दिवस साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जनार्दन कांबळे कांबळे, सामाजिक कार्यकर्ते जाहिद फकजी, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य डॉ. विश्वास चव्हाण, संयोजक डॉ.नारायण बागुल, डॉ. सीमा नाहिद, डॉ.सुभाष म्हात्रे, डॉ. श्रीशैल बहिरगुडे, प्रा. चिंतन पोद्दार, प्रा मुस्कान रज्ञब, प्रणव बागवे, प्रा. सिध्देश सतविडकर, प्रा. प्रवेश पाटील डॉ.गजानन मुनेश्वर प्रा. रुफी हसवारे आदींसह प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी जाहीद फकजी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालय विकास समितीचे सदस्य डॉ. विश्वास चव्हाण, प्राचार्य जनार्दन कांबळे यांनीसुद्धा विचार मांडले. हिंदी विभागाध्यक्ष डॉ. नारायण बागुल यांनी प्रास्ताविक केले.

या वेळी राज भाषा हिंदी या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अरफात सिरसीकर प्रथम, अंतरा मसाला द्वितीय, रीदा किल्लेकर आणि अल्मिरा घारे तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले तसेच काव्यवाचन स्पर्धो ही घेण्यात आली. यामध्ये राज पवार प्रथम, फिजा जामदार द्वितीय, अरफात शिरसीकर तृतीय आणि अंतरा मसाल उत्तेजनार्थ क्रमांकाचे मानकरी ठरले.

हिंदी विभागातील विद्यार्थ्यांनी आपल्या कविता सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली तसेच काही विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेविषयी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अल्मिरा घारे हिने केले, तर उपस्थितांचे आभार अंतरा मसाल हिने मानले.

# ट्रकचालकाने केला अपहार

**खोपोली : प्रतिनिधी**

कारखान्यात टँकरद्वारे खाद्यतेल पोहचवण्यासाठी नेत असताना चालकाने १५० किलो तेल चोरी करून त्या ऐवजी पाणी भरण्याचा प्रकार खालापुरात घडला आहे. या घटनेनंतर टँकर चालक फरारी झाला आहे. खालापूर हद्दीत इंसाबे गाव येथे पतंजली फुडस लि. कारखाना आहे. या कारखान्यात जेएनपीटी बंदर, उरण येथून खाद्यतेल पोहचवण्यासाठी टँकरमध्ये भरून पाठवण्यात आले होते, पण चालकाने अपहार केला. याबाबत खालापूर पोलीस ठाण्यात फरार चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

# ओमानने टीम इंडियाला झुंजवले!

## आशिया चषकात भारताच्या विजयाची हॅट्ट्रिक

**अबुधाबी : वृत्तसंस्था**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत अंतिम साखळी सामन्यात तुलनेने दुबळा समजल्या जाणाऱ्या ओमान संघाने विजेतेपदाचा प्रबळ दावेदार समजल्या जाणाऱ्या भारतीय संघाला झुंजवले. भारताने हा सामना जरी २१ धावांनी जिंकला तरी ओमानने २० षटकांत ४ बाद १६७ धावा करत दिलेली झुंज कौतुकास्पद ठरली. भारताकडून संजू सॅमसनने ४५ चेंडूंत ५६ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली, तर ओमानकडून अमीर कलीमने ४६ चेंडूंत ६४ धावा आणि हमद मिर्झाने ३३ चेंडूंत ५१ धावा काढत भारतीय गोलंदाजांचा धैर्याने सामना केला. विशेष म्हणजे या लढतीत ओमानने भारताचे आठ फलंदाज बाद केले.





प्रथम फलंदाजी करताना या लढतीत भारतीय संघाने ओमानसमोर १८८ धावसंख्या उभारली. मधल्या फळीतील फलंदाज संजू सॅमसनने ४५ चेंडूंत ५६ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. त्याने तीन चौकार आणि तीन षटकारांची आतषबाजी केली. कर्णधार सूर्यकुमार यादवने स्वतःला ११व्या क्रमांकावर पाठवून संघातील प्रत्येक खेळाडूला फलंदाजीची संधी दिली. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना उपकर्णधार शुभमन गिल (५ धावा) स्वस्तात बाद झाला. संजू सॅमसनने तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला येत संघाचा डाव सांभाळला. सुरुवातीला त्याला काही अडचणी आल्या, तरी त्याने तीन चौकार आणि तीन षटकारांसह आपले अर्धशतक पूर्ण केले. अभिषेक शर्माने १५ चेंडूंमध्ये ३८ धावांची तुफानी खेळी केली. अक्षर पटेलला (२६ धावा) तिलक वर्माच्या (२९ धावा) आधी फलंदाजीसाठी पाठवण्यात आले. हार्दिक पांड्यालाही काही फटके मारण्याची संधी मिळाली, पण तो दुर्दैवाने धावबाद झाला. अखेरच्या षटकांमध्ये हर्षित राणाने १३ धावांचे योगदान देत संघाची धावसंख्या १८८पर्यंत नेली.

विजयासाठी १८९ धावांचे मोठे आव्हान घेऊन मैदानावर उतरलेल्या ओमानला भारत सहज हरवेल, असे वाटले होते, पण ओमानच्या फलंदाजांनी भारतीय गोलंदाजाचा धैर्याने सामना करत फलंदाजी केली. सलामीवीर जितेंदर सिंग (३२ धावा) आणि अमीर कलीम (६४ धावा) यांनी शानदार सलामी देत ५६ धावांची भागीदारी केली. पाच चौकारांसह ३२ धावा काढणाऱ्या जितेंदरला फिरकी गोलंदाज कुलदीप यादव त्रिफळाचित केले. त्यानंतर कलीमने हमद मिर्झासह ९३ धावांची शानदार भागीदारी केली. दोघांनी भारतीय गोलंदाजीचा समाचार घेतला. कलीमने ४६ चेंडूंत ६४ धावा काढताना सात चौकार आणि दोन षटकार मारले, तर हमद मिर्झाने पाच चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ३३ चेंडूंत ५१ धावांची दमदार खेळी साकारली.

कलीमला हर्षित राणाने बाद केले, तर हमद मिर्झाला हार्दिक पंड्याने तंबूत धाडले. त्यानंतर जिकरिया इस्लाम ०, विनायक शुक्ला २, जितेनकुमार १२ हे स्वस्तात बाद झाले. भारताकडून आठजणांनी गोलंदाजी केली. कुलदीप यादव, हार्दिक पांड्या, अर्शदीप सिंग, हर्षित राणा यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. अक्षर पटेल, शुभम दुबे, तिलक वर्मा आणि अभिषेक शर्मा यांनी गोलंदाजी केली. या लढतीत भारताने स्टार गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि फिरकी गोलंदाज वरुण चक्रवर्ती या हुकमी खेळाडूंना विश्रांती दिली होती.

# ‘सीकेटी’चे विद्यार्थी कुस्ती स्पर्धेत चमकले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी आणि पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धा नावडे येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश मिळविले.



१४ वर्षाखालील ५६ किलो वजनी गटात करण केशव चौहान याने रौप्यपदक पटकाविले, तर मोहित गणेश पाटील (३५ किलो वजनी गट), देवेंद्र भालचंद्र बैदु (४४ किलो वजनी गट) आणि विराज रमेश रावरिया (४९ किलो वजनी गट) यांनी कांस्यपदक जिंकले. स्पर्धेच्या पुढील स्तरासाठी या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. याबद्दल त्यांचे शाळेचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक आणि शिक्षक यांनी कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील नावडे येथे झालेल्या मुलांच्या फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धेत नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले. ही स्पर्धा राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय व पनवेल महापालिका यांच्या वतीने घेण्यात आली.




१९ वर्षांखालील गटात वेद मुकेश ठाकूर (बारावी सायन्स) याने प्रथम क्रमांक प्राप्त केला असून त्याची मुंबई विभागीय शालेय स्पर्धेसाठी निवड झाली आहे तसेच निखिल केशव भावे (बारावी सायन्स) आणि साई नितीन जाधव (बारावी सायन्स)या दोघांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## कस्तुरी दिवेकरचे मैदानी स्पर्धेत सुयश

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**

माणगाव तालुकास्तरीय मैदानी स्पर्धा खर्डी क्रीडा संकुल येथे झाल्या. या स्पर्धेत अशोकदादा साबळे जुनिअर कॉलेजची विद्यार्थिनी कस्तुरी कृष्णा दिवेकर हिने १९ वर्षाखालील गटात २०० मीटर धावणे प्रकारात आणि लांब उडीत प्रथम क्रमांक पटकावला.



कस्तुरीची निवड जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी झालेली आहे. तिचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे. माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, काशीराम पवार, पत्रकार अरुण पवार, गणेश भोस्तेकर, दत्ता शिंदे, मारुती मालोरे, दिनेश पवार, रवींद्र पारखे, वैभव पवार, भगवान पवार, बाळा पवार, शशिकांत पवारें महेश पवार आदींनी कस्तुरीला शुभेच्छा दिल्या. तिला प्रशिक्षक रावळे यांचे मार्गदर्शन लाभले.

# माणगावच्या ध्रुवी खाडे, अर्णव खाडेचा जलतरणात डंका

**माणगाव : प्रतिनिधी**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत आयोजित रायगड जिल्हास्तरीय शालेय जलतरण स्पर्धा पेण येथील मामा वासकर जलतरण तलाव या ठिकाणी झाली. या स्पर्धेत माणगावमधील ध्रुवी खाडे व अर्णव खाडे या बहीण-भावाने चमकदार कामगिरी केली. ध्रुवीची मुंबई विभागावर खेळण्यासाठी निवड झाली आहे.

मुगवली येथील लीड स्कूलमध्ये शिक्षण घेणारी ध्रुवी खाडे हिने जलतरणाच्या फ्रिस्टाईल ५० मीटर आणि २०० मीटरमध्ये सुवर्णपदक तसेच १०० मीटर फ्रिस्टाईल स्पर्धेत रौप्यपदक पटकाविले. त्याचप्रमाणे अर्णव खाडे याने १४ वर्षाखालील मुलांच्या गटात फ्रिस्टाईल २०० मीटरमध्ये रौप्य आणि ५० मीटरमध्ये कांस्यपदक मिळविले. विशेष म्हणजे, दोन्ही भावंडांनी जलतरणासाठी अत्याधुनिक सुविधा नसतानाही मेहनत, चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे.

राष्ट्रीय हॉकीपटू व राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना माणगाव तालुका शाखा अध्यक्ष राजेंद्र खाडे व त्यांच्या पत्नी तळा येथे मंडळ अधिकारी समीरा खाडे यांचे ध्रुवी व अर्णव ही मुले आहेत. ॲड. राजीव साबळे यांच्या भादाव येथील निवासस्थानी असलेल्या छोट्याशा स्विमिंग पूलमध्ये नियमित सराव करून खाडे बहीण-भावाने इथवर मजल मारली आहे.





या यशाबद्दल शाळेचे प्राचार्य श्री. बसवराज यांनी दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच क्रीडा शिक्षक मंदार चौरकर व जलतरण प्रशिक्षक श्री. दळवी यांनी या दोघांचे विशेष कौतुक केले आहे. ध्रुवी व अर्णव यांच्या पुढील वाटचालीसाठी संपूर्ण तालुक्यातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# पनवेलच्या महात्मा फुले महाविद्यालयात मुलींची कबड्डी स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान वाणिज्य महाविद्यालयाच्या प्रांगणात मुंबई विद्यापीठाच्या झोन क्र.१ची मुलींची आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा नुकतीच रंगली. विविध महाविद्यालयांतील एकूण १८ संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते.

प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी प्रास्ताविक व उपस्थित पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रमुख पाहुणे सीबीडी बेलापूर विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त व तीन वेळा कुस्ती खेळात महाराष्ट्र केसरी पुरस्कार प्राप्त विजय चौधरी यांनी प्रथम रयत शिक्षण संस्था आणि महाविद्यालयाच्या चांगल्या नियोजनाबद्दल कौतुक केले. आपल्या मनोगतात त्यांनी त्यांच्या कॉलेज जीवनातील व खेळाविषयी आठवणींना उजाळा दिला. सर्व खेळाडूंना शुभेच्छा देऊन त्यांनी महिला कबड्डी खेळाडूंना प्रोत्साहित केले. महाविद्यालयाच्या वतीने वैभव ढवळे व कबड्डी खेळाडू तेजा सपकाळ यांचा विशेष सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला.




या वेळी मुंबई विद्यापीठ मुंबई क्रीडा संचालक डॉ. मनोज रेड्डी, मुंबई विद्यापीठाच्या झोन क्र. १चे सचिव डॉ. मनोज वर्मा, शिवछत्रपती पुरस्कार विजेते क्रीडा प्रशिक्षक सुर्यकांत ठाकूर यांची विशेष उपस्थिती होती. त्याचप्रमाणे उपप्राचार्य डॉ. आर.ए. पाटील, डॉ. लक्ष्मण गवळी, प्रा. जिंनगोंडा बोरगावे, डॉ. विलास महाले, विविध महाविद्यालयांचे क्रीडा संचालक प्रा. पूनम पठाण, प्रा. रामसागर पांडे, यशवंत पाष्टे, निकिता लाड, विनोद नाईक आदी उपस्थित होते.

स्पर्धेत प्रथम क्रमांक महर्षी दयानंद कॉलेज, परळ यांनी पटकविला. द्वितीय क्रमांक महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल, तृतीय क्रमांक आरएडीएव्ही कॉलेज, भांडूप यांनी, तर चतुर्थ क्रमांक गुरूनानक खालसा महाविद्यालय यांनी मिळवला. या संघांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

सूत्रसंचालन प्रा. प्रवीण गायकर, डॉ. यशवंत उलवेकर यांनी केले. तर स्पर्धेचे नियोजन जिमखाना प्रमुख डॉ. प्रफुल्ल वशेणीकर, प्रा. विलास बढे आणि जिमखाना कमिटीतील सदस्यांनी केले, तर महाविद्यालातील प्राध्यापक व शिक्षकेतर सेवकांचे सहकार्य लाभले.



## जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेत हिरानंदानी ट्रस्ट स्कूल विजेते

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

अलिबाग येथील जिल्हा क्रीडा संकुलात झालेल्या सन २०२५-२६च्या जिल्हास्तरीय शालेय फुटबॉल स्पर्धेत हिरानंदानी ट्रस्ट स्कूलच्या अंडर-१४ आणि अंडर-१७ वयोगटातील मुलांनी विजेतेपद पटकावले.

दोन्ही संघांनी दमदार कामगिरी करून मुंबई विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. शाळेच्या प्राचार्य रूपा चौधरी यांनी खेळाडूंचे कौतुक व अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षणाचे शिक्षक प्रणव लबडे यांच्या मार्गदर्शन लाभत आहे. विद्यार्थ्यांनी विजेतेपद पटकावल्यामुळे त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.







**डोंबिवली : भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, भाजप नेते तथा रायगड जि.प.चे माजी अध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, महिला मोर्चा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष चित्रा पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभीष्टचिंतन केले आणि त्यांना उदंड आयुष्य, उत्तम आरोग्य तसेच यशस्वी राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

## हार्दिक पांड्याने घेतला भन्नाट झेल

**नवी दिल्ली** : आशिया कप २०२५च्या ग्रुप अ सामन्यात भारताने ओमानचा २१ धावांनी पराभव केला. टीम इंडियासाठी हा विजय म्हणावा तितका सोपा नव्हता. ४३ वर्षीय फलंदाज आमिर कलीमच्या खेळीमुळे ओमान मजबूत स्थितीत आला होता, परंतु अष्टपैलू हार्दिक पांड्याच्या एका चमत्कारिक झेलमुळे सामना पलटला.



सामन्यात ओमानसमोर विजयासाठी १८९ धावांचे लक्ष्य होते. एका क्षणी कलीमच्या खेळीमुळे ओमानला विजयाची आशा होती, पण हार्दिक पांड्याने अप्रतिम झेल टिपत त्या आशा धुळीस मिळवल्या. कलीमने ४६ चेंडूत ६४ धावा केल्या, ज्यात सात चौकार आणि दोन षटकारांचा समावेश होता. शेवटच्या क्षणी ओमानला विजयासाठी १४ चेंडूत ४० धावांची आवश्यकता होती आणि कलीम तुफान फॉर्ममध्ये होता. त्यावेळी १८व्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर हार्दिक पांड्याच्या चपळतेने झेल टिपला. हर्षित राणाच्या गोलंदाजीवर त्याने स्वीप शॉट खेळला, तेव्हा हार्दिकने सीमारेषेवर एका हाताने झेल टिपला.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com